रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३५१ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## ‘जामिनाची मुदत वाढवा’

दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे सध्या जामिनावर बाहेर आहेत. त्यांना निवडणुकीच्या प्रचारासाठी १ जूनपर्यंत जामीन मंजूर करण्यात आला आहे. तसेच २ जून रोजी त्यांनी पुन्हा आत्मसमर्पण करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र, आता अरविंद केजरीवाल यांनी जामिनाची मुदत वाढवून मागितली असून यासंदर्भात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. वैद्यकीय कारणांमुळे जामिनाची मुदत ७ दिवसांनी वाढवून द्यावी, अशी मागणी अरविंद केजरीवाल •> पान २ वर

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २८ मे २०२४

किंमत ४ ₹

## सेल्फीच्या नादात गेला जीव

**धाराशिव :** आठ दिवसांपूर्वी विवाह झालेले दाम्पत्य फिरण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील भुईकोट किल्ल्यात आले होते. किल्ल्यावरील उपली बुरूजावरून सेल्फी फोटो घेत असताना वाऱ्याच्या झोकामुळे नवविवाहितेचा तोल गेला आणि बुरूजावरून खाली पडून तिचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी सकाळी घडली आहे. तुळजापूर तालुक्यातील हंगरगा (तुळ) येथील अमीर शेख हे आपली पत्नी व दोन नातेवाईकांसह किल्ला पाहण्यासाठी किल्ल्यात आले होते. अमीर शेख व त्याची पत्नी निलोफर शेख यांचा आठ दिवसांपूर्वी •> पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**अति झाले अन् हसू आले**

**वे|ध|क**

## आरे-वारे समुद्रात चौघे बुडाले

**रत्नागिरी :** रत्नागिरी तालुक्यातील आरे-वारे समुद्रकिनारी मौजमजा करताना रत्नागिरीतील गाडेकर कुटुंबियातील चौघेजण समुद्रात बुडाल्याची घटना रविवारी सायंकाळी ६:३० वाजता घडली. यामध्ये तिघांना वाचवण्यात स्थानिकांसह नातेवाईकांना यश आले आहे. पंकज रामा गाडेकर (३३, रा. कारवांचीवाडी रत्नागिरी) यांचा बुडून मृत्यू झाला. नोकरीनिमित्त पुणे येथे स्थायिक असलेले पंकज रामा गाडेकर हे पत्नी मयुरी गाडेकर यांच्यासह रत्नागिरीतील कारवांचीवाडी येथील आपल्या गावी सुट्टीसाठी आले होते. •> पान २ वर

## अडवाणी पाकिस्तानी; राबडीदेवींचा निशाणा

**पाटणा :** पाकिस्तानचे जिहादी इंडिया आघाडीच्या नेत्यांना पाठिंबा देत आहेत, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. यावरून बिहारच्या माजी मुख्यमंत्री आणि आरजेडी नेत्या राबडी देवी यांनी सोमवारी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आता पाकिस्तानात निघणार आहेत. पाकिस्तान-पाकिस्तान करत राहा. तसेच, भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी हे पाकिस्तानी आहेत, ते भारतात येऊन स्थायिक झाले, असे राबडी देवी यांनी म्हटले आहे. याशिवाय, भारत सरकारच्या एजन्सी काय करत आहेत? पंतप्रधान नरेंद्र मोदी •> पान २ वर

## राज्याचा दहावीचा निकाल ९५.८१ टक्के

# ‘कोकण’-‘कन्या’ सरस

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राज्य शिक्षण मंडळाच्या मार्च- २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे कोकण विभागाने यंदाही बाजी मारली आहे. कोकण विभागाचा निकाल ९९.०१ टक्के लागला असून राज्यातील मुलींनी बाजी मारली आहे. त्यामुळे राज्यात कोकण-कन्या अव्वल ठरल्या आहेत.



**9382 शाळांचा शंभर टक्के निकाल**

- पुणे 1542
- नागपूर 1007
- छ. संभाजीनगर 840
- मुंबई 1533
- कोल्हापूर 1270
- अमरावती 1063
- नाशिक 1006
- लातूर 608
- कोकण 513

**23288 शाळांची नोंदणी**

**40.29 टक्के शंभर टक्के शाळा**

**0.16 शून्य टक्के निकाल शाळा**

**राज्यातील ३८ शाळांना भोपळा**

- पुणे : ६
- नागपूर : ५
- छत्रपती संभाजीनगर :५
- मुंबई : ५
- कोल्हापूर : १
- अमरावती : ७
- नाशिक विभाग : ३
- लातूर : ६

कोकण विभागात एकाही शाळेचा निकाल शून्य टक्के लागला नाही.

दहावीचा यंदाचा एकूण निकाल ९५.८१ टक्के इतका लागला. यंदाच्या निकालात नेहमीप्रमाणे आणि १२ वीच्या निकालाप्रमाणेच १० वीच्या परीक्षेत देखील मुलींनी बाजी मारली. तर एकूण ९ विभागात घेण्यात आलेल्या परीक्षेत यंदाच्या •> पान २ वर

## ‘पीएनपी’चा १०० टक्के निकाल

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे.पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमांमध्ये पीएनपी इंग्लिश मिडियम होली चाईल्ड स्कूल वेश्वी गोंधळपाडा शाळेची विद्यार्थिनी प्रथा पाटील ८९.६० टक्के गुण मिळवून प्रथम, नियती पाटील ८८.२० टक्के गुण मिळवून द्वितीय तर चेतना बांगर ८८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. पीएनपीच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा निकाल १०० टक्के लागलेला असून मराठी माध्यमांच्या बहुतांशी शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.


## रायगडचा निकाल ९६.७५ टक्के

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल सोमवारी(दि. २७) जाहीर झाला.या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा ९६.७५ टक्के लागला असून मुली ९७.६५ टक्के व मुले ९५.८७ टक्के उतीर्ण झाले आहेत. मात्र यंदाही निकालामध्ये मुली मुलांपेक्षा १.७८ टक्के अधिक सरस असल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीच्या परीक्षा घेण्यात आल्या. १ मार्च ते २६ मार्च या दरम्यान दहावीची परीक्षा झाली. •> पान २ वर

# वरंध घाट कागदोपत्री बंद




**। महाड । वार्ताहर ।**

म्हाप्रळ-पंढरपूर मार्गावरील वरंधा घाट कागदोपत्री बंद असला तरी प्रत्यक्षात मात्र वाहतूक आजही सुरू आहे. यामुळे पावसाळ्यात वरंध घाट धोकादायक बनणार आहे. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे ठिकठिकाणी धोकादायक स्थिती असून हलगर्जीपणा प्रवाशांच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे.

म्हाप्रळ-पंढरपूर मार्ग हा पुणे जिल्ह्याला जोडणारा •> पान २ वर

## मोदी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे

**नितीश कुमारांची जीभ घसरली**

**। पाटणा । वृत्तसंस्था ।**

पाटणा येथील सभेदरम्यान मुख्यमंत्री नितीश कुमार यांची जीभ घसरली. या सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री नितीश यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मुख्यमंत्री म्हटले. रविवारी मुख्यमंत्री नितीश पाटणा •> पान २ वर

## रेवन्ना ३१ मे रोजी हजर होणार

**। कर्नाटक । वृत्तसंस्था ।**

सेक्स स्कँडलचा आरोपी आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवन्ना याने सोमवारी व्हिडिओ जारी केला. मी ३१ मे रोजी एसआयटीसमोर हजर राहीन, असे त्यात म्हटले आहे. माझ्यावरील सर्व आरोप खोटे असल्याचे यात म्हटले आहे. तत्पूर्वी, गुरुवारी, २३ मे रोजी एचडी देवेगौडा यांनी त्यांचा नातू आणि लैंगिक घोटाळ्यातील आरोपी प्रज्वलला भारतात परतण्याचा आणि चौकशीला सामोरे जाण्याचा इशारा दिला. या प्रकरणाच्या तपासात आपला आणि कुटुंबियांचा कोणताही हस्तक्षेप होणार नाही, असा दावाही त्यांनी केला. प्रज्वलवर ३ महिलांच्या छेडछाडीचे ३ गुन्हे दाखल आहेत. २६ एप्रिल रोजी लोकसभेच्या मतदानानंतर ते जर्मनीला •> पान २ वर



## २० हातरिक्षा चालकांचे नशीब चमकले

**। माथेरान । वार्ताहर ।**

**ई-रिक्षासाठी पालिकेत निघाली सोडत**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने २० ई-रिक्षा प्रायोगिक तत्वावर चालविण्यात येणार असल्याने परवाना हातरिक्षा चालकांना देणार असल्याने त्याची सोडत माथेरान नगरपालिका कार्यालयात घेण्यात आली. २४ अर्ज नगरपालिकेत प्राप्त झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशाने ही सोडत माथेरान नगरपालिकेत घेण्यात आली. यामध्ये २० हातरिक्षा चालकांचे नशीब चमकले आहे. सनियंत्रण समितीचे सचिव हे रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असून त्यांच्याकडून आलेल्या आदेशाने सोमवारी (दि.२७) सायंकाळी ५:३० वाजता ही सोडत घेण्यात आली.

२४ अर्ज दाखल झाले असून त्यावर काही आक्षेप असल्यास बोलावे, असे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सांगितले. •> पान २ वर

## ‘न्यायासाठी सत्तेत जावे लागणार’

**। बीड । वृत्तसंस्था ।**

आपले आंदोलन मोडण्याची कोणाचीही ताकद नाही. आंदोलन हा संविधानाने दिलेला एक हक्क आहे. काहीजण राजकीय हितापोटी जातीय तेढ निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार असून आम्ही हक्कासाठी लढत आहोत. आम्ही शांत आहोत, आम्हाला शांत राहू द्या. जातीय तेढ निर्माण करु नका, असे आवाहन मनोज जरांगे यांनी सर्व मराठा बांधवांना केले आहे. •> पान २ वर






# रायगडच्या वनसंपदेत वाढ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**जंगलांच्या संरक्षणासाठी वनविभागाकडून होणारे प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील वनक्षेत्रात वाढ झाली आहे. सामाजिक वनीकरण, वनविभागाने सातत्याने राबवलेल्या उपक्रमांमुळे पश्चिम घाटाचा भाग असलेल्या रायगड जिल्ह्यात वृक्षतोडीचे प्रमाण कमी झाले आहे. पूर्वी इमारत आणि स्वयंपाकासाठी ९० टक्के वापर जंगलातील लाकडांचा केला जात होता, आता हे प्रमाण २० टक्क्यांवर आले आहे.**



वनक्षेत्र वाढू लागल्याने या क्षेत्रातून गायब झालेली गिधाडे, गवे, नीलगाय, सांबर, चितळ यांसारख्या प्राण्यांचे पुन्हा आगमन झाले आहे.निसर्गप्रेमी, सर्पमित्र आणि सिस्केपसारख्या वन्यजीव संस्थांनी केलेल्या भरीव कामगिरीमुळे रायगडमधील चित्र पालटले आहे.

मांडूळ, घोरपड, खवलेमांजर यासारख्या सरपटणारे प्राणी तस्करीत सापडून यायचे, आता तस्करीमध्येही घट झाल्याचे वनविभागाचे म्हणणे आहे. जिल्ह्यात एकूण १७२५.४४ चौरस किलोमीटर वनक्षेत्रापैकी १३४,६५ चौरस किमी क्षेत्र राखीव आहे. यात फणसाड वन्यजीव आणि कर्नाळा पक्षी अभयारण्याचा समावेश होतो. अभयारण्य परिसरातील लोकांमध्ये वृक्षतोडीबाबत झालेली जनजागृती, वन्यप्राण्यांच्या संरक्षणाबाबत उपाययोजनांमुळे वन्यप्राण्यांची संख्या तीन वर्षांत १५ टक्क्यांनी वाढल्याचा अंदाज आहे.

माथेरान, कर्नाळा, फणसाड यांसारख्या ठिकाणी विपुल वनसंपदा आहे. हिरवीगार झाडे, विविध प्रजातींच्या पशुपक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी अभ्यासक, पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे आसपासच्या गावकऱ्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाल्याने वनसंवर्धनाची मानसिकता वाढू लागली आहे. कांदळवन क्षेत्रात उपजिविकेची साधने निर्माण करण्याचा प्रयत्नही सुरू आहे. त्याचबरोबर रोजगाराची पर्यायी साधने निर्माण झाल्याने आदिवासींकडून होणारी वृक्षतोड कमी झाल्याचे वन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

रायगड जिल्ह्यातील जंगलात आजमितीस १७ प्रकारच्या सस्तन प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे मानचिन्ह असणारा झुबकेदार शेपूट असणारा राज्यप्राणी शेकरूचे दर्शन येथील अभयारण्यात होते. शेकरूची घरटी उंच झाडावर वैशिष्टपूर्ण अशी पानांनी मढलेली असतात. फणसाडमध्ये भल्या पहाटे व सायंकाळी अभयारण्यातील प्रमुख शिकारी प्राणी, बिबट्याचे दर्शन अनेकदा पर्यटकांना होते. भारतातील सर्वात मोठे हरिण-सांबर व सर्वात छोटे हरिण-पिसोरी हे दोन्ही याच अभयारण्यात आढळून येतात. एकमेव उडू शकणारा सस्तन प्राणी वटवाघुळाची पॅटेड बॅट या प्रजातीची नोंद याठिकाणी करण्यात आली आहे. याशिवाय रानससा, साळिंदर, रानडुक्कर, मुंगूस, वानर, माकड, रानमांजर, तरस, कोल्हा हे वन्यप्राणीही आढळतात. फणसाड अभयारण्यात गत वर्षांपासून रानगव्यांची संख्या वाढली असून निरीक्षणात साधारण २० रानगवे आढळले आहेत.

## सळई चोरी करणारा गजाआड

**पनवेल :** ५ टन लोखंडी वजनाच्या सळाईंची चोरी करणाऱ्या आरोपीस पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. पनवेल जवळील पुष्पक नगर येथे एका बांधकाम व्यावसायिकाचे एका मोठ्या प्रोजेक्टचे काम सुरू असल्याने सदर प्रोजेक्टसाठी लागणाऱ्या लोखंडी सळया या नागपूर येथून एका खाजगी ट्रेलरमधून मागविण्यात आल्या होत्या.

परंतु त्या मालापैकी ५ टन लोखंडी सळाईंची चोरी झाल्याची तक्रार दाखल होताच पोलीस उपनिरीक्षक हर्षद राजपूत यांनी सखोल तपास सुरू केला असता सदर गुन्ह्यातील आरोपी हा बीड येथे चोरीच्या मालासह लपल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे आरोपी चालक उस्मान कासम सय्यद (३६) याला मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

## केअर ऑफ नेचर संस्थेने दिले नवरंग पक्ष्याला जीवनदान

**। उरण । वार्ताहर।**

केअर ऑफ नेचर संस्थेचे चिंचपाडा शाखाध्यक्ष रुपेश पाटील यांना पनवेल येथील करंजाडे येथे त्यांच्या राहत्या घराजवळ मभारतीय नवरंगफ हा पक्षी अशक्त अवस्थेत पडून असल्याचे दिसून आले. त्यांनी या पक्षाला तिथून उचलून पुढील उपचारासाठी केअर ऑफ नेचर संस्थेचे संस्थापक, महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर यांना ही बातमी सांगितली.

नवरंग हा दुर्मिळ पक्षी अशा कमकुवत अवस्थेत असल्याचे कळताच केअर ऑफ नेचरचे संस्थापक राजू मुंबईकर यांनी त्या पक्षावर उपचार करण्यासाठी त्याला वेश्वी येथे आपल्या घरी आणून वेळीच त्याचावर उपचार करण्यास सुरुवात केली. केअर ऑफ नेचर या संस्थेकडून गेली अनेक वर्षे, स्नेक रेस्क्यू, जखमी वन्यजीवांवर उपचार, वृक्षारोपण आणि अशा अनेकानेक प्रकारची निसर्ग संवर्धनाची कामे सातत्याने करण्यात येतात. दुर्मिळ आणि तितकाच आकर्षक असा हा नवरंग पक्षी, सुश्रुषा करून हा पूर्णपणे बरा झाल्यानंतर त्याला दुसऱ्या दिवशी वेश्वी येथील डोंगरात त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त केले.

पावसाळ्यापूर्वी अनेक प्रजातीचे पक्षी स्थलांतर करून येत असतात. रायगड जिल्ह्यासाठी प्रमुख आकर्षण ठरणारा पक्षी म्हणजे हा भारतीय नवरंग. या पक्षाच्या शरीरावर असलेल्या विविध नऊ रंगामुळेच नवरंग हे नाव पडलेलं आहे.


### जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील अर्चना समीर पोतदार, रा. राजदीप सोसायटी, गोखले रोड, मल्हार टॉकीजजवळ, नौपाडा, ठाणे (पश्चिम) जिल्हा ठाणे ४००६०२ यांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक समीर लालचंद म्हात्रे, रा.४०२, साईछाया अपार्टमेंट, नांदिवली रोड, दिसलेपाडा, डोंबिवली (पूर्व), गजानन चौक जवळ, कल्याण, ठाणे टिळक नगर ४२१२०१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा व तुकडी रायगड व पोटतुकडी व तालुका कर्जत मा. दुय्यम निबंधक, कर्जत यांचे क्षेत्राधिकारातील मौजे आसलपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे आर-पॉ. | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १५ | १ ब | जिरायत १-२०-५०<br>पोटखराब ०-०५-८०<br>एकूण क्षेत्र १-२६-३० | ७-०० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : २८ मे २०२४

**ॲड. प्रविण पुंडलिक कराळे**
बी.ए.एलएल.बी.
अधिवक्ता
पत्ता : मु. बेकरे, पो. माणगांव, ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०१०१
९९७५०९०३०४/९६०७५५६३१५
pravinkarale1992@gmail.com


# संपूर्ण महाराष्ट्रात ‘सरकार जगाव’अभियान



**। उरण । वार्ताहर।**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाची केंद्रीय कार्यकारिणीची बैठक शनिवार, रविवार २५ व २६ मे रोजी वासुदेवानंद हॉल कुडाळ सिंधुदुर्ग येथे संपन्न झाली. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या विविध विषयांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेवून कंत्राटी कामगारांना न्याय द्यावा अन्यथा महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ महाराष्ट्र राज्यात सरकार जगाव अभियान आयोजित करून न्याय हक्कांच्या करिता आंदोलनात्मक मार्गांचा अवलंब करावा लागेल असा इशारा सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी दिला आहे .

भारतीय मजदूर संघाचे प्रदेश सचिव हरी चव्हाण यांनी दीप प्रज्वलन केले. विधानसभेपूर्वी संघर्षासाठी कामगारांनी तयारी सुरू करावी. शासन कामगारांसाठी असते, कंत्राटी पद्धत बंदची मागणी रास्त असल्याचे ते म्हणाले.अनेक जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव, जिल्हा संघटन मंत्री व जिल्हा कोषाध्यक्ष उपस्थित होते.

कृती समितीच्या केंद्र स्थानी कंत्राटी कामगार असावा त्यात राजकारण असता कामा नये. वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहीत शाश्वत रोजगार, सामाजिक सुरक्षा व लिविंग वेजेस मिळावे भरती प्रक्रियेमध्ये वयात सवलत आरक्षण मिळावे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनानुसार निर्णयाची अंमलबजावणी करावी. असे महामंत्री सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केले

ई.एस.आय.सी, पी.एफ व वीज कंपनी कार्यालयात असलेल्या प्रलंबित तक्रारींबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जुलैमध्ये सरकार जगाव अभियान राबवून प्रत्येक जिल्ह्यात कंत्राटी कामगारांच्या मेळावे घेऊन संघटन मजबूत करण्याचे आवाहन संघटन मंत्री उमेश आनेराव यांनी केले.

ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचना दिल्यानंतरदेखील महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक वीज कंत्राटी कांमगारांच्या समस्यां सोडवण्यासाठी ५ जून पूर्वी कंत्राटी कामगार संघासोबत बैठक न घेतल्यास वीज कंपनीच्या वर्धापनदिनादिवशी ६ जून रोजी राज्यभरातील कंत्राटी कामगार काळ्या फिती लावून प्रशासनाचा निषेध व्यक्त करतील अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात यांनी दिली. कार्यक्रमाचे आयोजन सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष आनंद लाड यांनी केले तर सूत्र संचलन राहुल बोडके यांनी केले.



## माथेरानमध्ये आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यरत

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान हे पर्यटनस्थळ असून डोंगर माथ्यावर वसलेले आहे. त्यामुळे इथे पावसाचे प्रमाण सर्वाधिक असून जवळपास साडेतीनशे इंच इतकी पावसाची नोंद पर्जन्यमापनामध्ये करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. चोहोबाजुंनी गर्द झाडी अन् डोंगर दऱ्यांनी परिपूर्ण व्यापलेला परिसर असल्याने अतिवृष्टीत तसेच झाडांच्या उन्मळन्यामुळे जीवितहानी होण्याची दाट शक्यता असते. यासाठी नगरपालिका प्रशासन आपत्कालीन व्यवस्थापनाकरीता कामगारांची नेमणूक करत असते.

पावसाळ्यातील चार महिने वादळी वाऱ्यासह झाडांची पडझड होत असते. सततच्या पावसाने रस्त्यांवरील मातीची धूप होऊन विद्युततारा उघड्या पडतात. त्यामुळे घोड्यांना शॉक लागून त्यांचा मृत्यु होण्याची शक्यता असते.त्याचप्रमाणे पावसाळ्यात भटकंतीसाठी आलेले पर्यटक पायी प्रवास करताना दिशा न समजल्यामुळे रानावनात भरकटत असतात अशावेळी त्यांना मदतीची नितांत आवश्यकता असते. याबाबी लक्षात घेऊन माथेरान नगरपालिकेने मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## ‘जामिनाची मुदत वाढवा’

यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. मागील काही दिवसांत माझं वजन ७ किलोनी कमी झालं आहे. त्यामुळे डॉक्टरांनी मला काही वैद्यकीय चाचण्या करण्यास सांगितल्या आहेत. यामध्ये पेट-सीटी स्कॅनचाही सम ावेश आहे. त्यामुळे मला जामिनाची मुदत ७ दिवसांसाठी वाढवून द्यावी, असं अरविंद केजरीवाल यांनी या याचिकेत म्हटलं आहे. महत्त्वाचे म्हणजे दिल्लीतील मॅक्स रुग्णालयातील वैद्यकीच चमुने यासंदर्भातील प्राथमिक चाचण्या पूर्ण केल्या असून या वैद्यकीयदृष्ट्या चाचण्या करणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी सांगितलं आहे.

## सेल्फीच्या नादात गेला जीव

म्हणजेच २० मे रोजी विवाह झाला होता. फिरायला जायचे म्हणून ते नळदुर्गचा किल्ला पाहण्यासाठी आले होते. किल्ल्यात गेल्यानंतर त्यांनी इतर स्थळांची पाहणी केली. त्यानंतर ११.३० वाजण्याच्या सुमारास किल्ल्यातील सर्वात उंच असणाऱ्या उपली बुरुजावर गेले. याठिकाणी उपली बुरुजावर गेल्यानंतर नवविवाहिता निलोफर यांना बुरुजावरून सेल्फी काढण्याचा मोह झाला. यावेळी वारा सुटलेला होता.सेल्फी काढण्यासाठी निलोफर शेख या बुरुजाच्या कडेला गेल्यानंतर त्यांचा तोल जावुन त्या बुरुजावरून खाली पडून गंभीर जखमी झाल्या. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचा पती अमीर शेख व इतर दोन नातेवाईकही बुरुजावरच होते. घटनेची माहिती मिळताच तत्काळ त्याठिकाणी असणाऱ्या युनिटी मल्टीकॉन्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी व निलोफरच्या नातेवाईकांनी किल्ल्यात असणाऱ्या वाहनांमधून गंभीर जखमी झालेल्या निलोफरला रुग्णालयात नेले. मात्र रुग्णालयात नेण्यापूर्वीच निलोफरचा मृत्यू झाला. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## अडवाणी पाकिस्तानी; राबडीदेवींचा निशाणा

अयशस्वी झाले आहेत का? संपूर्ण देशात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होणार आहे. बिहारमध्ये महाआघाडीची लाट आहे, असे राबडी देवी यांनी सांगितले. इंडिया आघाडीच्या उमेदावर मीसा भारती यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. मीसा भारती म्हणाल्या की, एनडीए सरकारने आम्हाला कंदिलाच्या युगात नेले आहे, आमचे सरकार आल्यानंतर २०० युनिट वीज मोफत दिली जाईल. तुम्ही खेड्यापाड्यात गेलात तर महिला आणि इतर लोक खासगीकरणामुळे वीज बिल खूप जास्त येत असल्याचे सांगत आहेत. इंडिया आघाडीचे सरकार स्थापन झाल्यास आम्ही २०० युनिट वीज मोफत देणार आहोत, असे मीसा भारती म्हणाल्या. याचबरोबर, मणेरचे लाडू कोण खाणार आणि हवा कोण खाणार हे ४ जूनला कळेल, असे एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितले. तसेच, सर्व विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकले जात आहे. गेल्या १० वर्षांपासून जनतेची फसवणूक केली जात आहे. ना महागाई गेली ना बेरोजगारी गेली, असेही मीसा भारती यांनी सांगितले.

## आरे-वारे समुद्रात चौघे बुडाले

गाडेकर कुटुंब रविवारी दुपारी संकष्टी चतुर्थीनिमित्त गणपतीपुळे येथे देवदर्शनासाठी गेले होते. त्यानंतर गणपतीपुळे येथील समुद्र धोकादायक असल्याने तिथे न जाता गाडेकर कुटुंबीय आरे- वारे समुद्रकिनारी आले. गाडेकर कुटुंबातील पंकज रामा गाडेकर, मयुरी पंकज गाडेकर, बालाजी रामा गाडेकर व त्यांचा एक भाचा असे चौघेजण पोहण्यासाठी समुद्रात उतरले होते. कमी पाण्यात मौजमजा सुरू असतानाच अचानक आलेल्या लाटेने पंकज गाडेकर लाटेबरोबर आत ओढले गेले. लाटे बरोबर ते आत जात असल्याचे लक्षात येताच त्यांची पत्नी मयुरी व भाऊ बालाजी हे त्यांना वाचवण्यासाठी पुढे गेले. मात्र, तेही पाण्यात बुडू लागताच किनाऱ्यावर असलेल्या मुले, महिलांनी आरडाओरड केल्यानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत चौघांनाही पाण्याबाहेर काढले. परंतु, पंकज गाडेकर हे खोल पाण्यात बुडाल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक होती. स्थानिकांनी तात्काळ १०८ रुग्णवाहिकेला संपर्क केला. परंतु, १०८ रुग्णवाहिका तासाभराने घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर चौघांनाही जिल्हा शासकीय रुग्णालय आणण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर पंकज रामा गाडेकर यांना मृत घोषित करण्यात आले.या घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक नितीन ढेरे, पोलीस अंमलदार जोशी, शिवगण यांनी जिल्हा रुग्णालयात जाऊन मृतदेहाचा पंचनामा केला. त्यानंतर रात्री उशिरा आकस्मिक मृत्यूची नोंद करण्याचे काम सुरू होते.

## ‘न्यायासाठी सत्तेत जावे लागणार’

त्यांच काम होईपर्यंत ते सगळ्यांच्या पाया पडले. मात्र, शेवटी एक पर्याय आहे. अन्याय बंद करायचा असेल आपल्याला सत्तेत जावं लागणार आहे असे मनोज जरांगे यांनी म्हणाले. महाराष्ट्र संतांची भूमी आहे. आम्ही कधीच म्हणणार नाही की एखाद्या समाजाच्या दुकानात जाऊ नका. असे विचार आम्ही ठेवणार नाहीत. जातीय तेढ निर्माण व्हायला काय झालं, १३ तारखेपर्यंत मतदान होईपर्यंत मराठे चांगले होते. १३ तारीख संपली की मराठे वाईट झाले. निवडणुकीत मराठ्यांनी तुमचं काम केलं नाही का, मराठ्यांनो मी तुम्हाला हात जोडून सांगतो, शांत राहा. आपण फक्त पाहायचं कोण काय करतंय. एक महिनाभर चुका करू द्या, आपण शांत राहा, असं मनोज जरांगे म्हणाले. ज्यांनी मराठा समाजावर अन्याय केला, त्यांच्या विरोधात उमेदवार द्यायचा नाही, पण नाव घेऊन त्यांना पाडल्याशिवाय सोडायचं नाही, असं म्हणत ४ जूनच्या उपोषणावर आपण शंभर टक्के ठाम आहोत. माझ्या समाजाच्या न्यायाचा विषय असून राज्य सरकारने आम्हाला दिलेल्या शब्दाला आज पाच महिने होऊन गेले आहेत. मग राज्य सरकारला अजून किती दिवस पाहिजेत,असंही मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

## ‘कोकण’-‘कन्या’सरस

निकालामध्ये कोकण विभागानेच बाजी मारली आहे. तर नागपूर विभाग मात्र तळाशी आहे.

तुलनेने सर्वात कमी निकाल नागपूर मंडळाचा ९४.७३ टक्के एवढा लागला आहे. दुसरा क्रमांक कोल्हापूर ९७.४५, पुणे ९६.४४ टक्क्यांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. मुंबई- ९५.८३, अमरावती- ९५.५८, नाशिक ९५.२८, लातूर ९५.२७, छत्रपती संभाजीनगर ९५.१९ या मंडळाचा क्रमांक लागतो. राज्यातील ९ हजार ३८२ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. तर १८७ विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळाले आहेत. त्यापैकी लातूर मंडळातील १२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदा ९५.८१ टक्के लागला आहे. १५ लाख ४९ हजार ३२६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती त्यापैकी १४ लाख ८४ हजार ४४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गतवर्षी पेक्षा १.९८ टक्के निकाल जास्त लागला आहे. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली. यावेळी सचिव अनुराधा ओक उपस्थित होत्या.

राज्यातील १८७ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले आहेत. अतिरिक्त गुण घेऊन त्यांना १०० टक्के गुण मिळालेले आहेत. प्रश्न पत्रिका सोडवून एकाला ही १०० टक्के गुण मिळालेले नाहीत, अशी माहिती बोर्डाकडून देण्यात आली.

## रेवन्ना ३१ मे रोजी हजर होणार

गेले होते, तेव्हापासून त्यांचा कुठेही पत्ता नाही. प्रज्वल हासन लोकसभा मतदारसंघातून जेडीएसचे उमेदवार आहेत.

माजी पंतप्रधान म्हणाले, मला माहीत आहे की, गेल्या काही दिवसांत लोकांनी या प्रकरणावर त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाविरोधात अनेक वाईट गोष्टी बोलल्या आहेत. मला या लोकांना थांबवायचे नाही. मला त्याच्याबद्दल वाईट बोलायचे नाही किंवा मला असे म्हणायचे नाही की त्याने सर्व तथ्ये समोर येण्याची वाट पाहिली पाहिजे. मी लोकांना हे पटवून देऊ शकत नाही की मला प्रज्वलच्या कृत्यांची माहिती नव्हती आणि मला त्याचा बचाव करण्याची इच्छा नाही. मला त्याच्या परदेश दौऱ्याची माहितीही नव्हती.

## मोदी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे

साहिबमधील भाजपचे उमेदवार रविशंकर प्रसाद यांच्या प्रचारासाठी दनियावन येथे आले होते. सभेला संबोधित करताना ते म्हणाले की, आम्हाला बिहारमधील सर्व ४० आणि देशभरातील ४०० हून अधिक जागा जिंकायच्या आहेत आणि नरेंद्र मोदींनी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे, जेणेकरून देशाचा विकास होईल आणि बिहारचा विकास होईल.हे ऐकून तिथे उपस्थित लोक हसू लागले. त्यांच्या शेजारी उपस्थित असलेल्या नेत्यांनी नितीश कुमार यांना अडवलं आणि म्हणाले ते पंतप्रधान आहेत, मुख्यमंत्री नाहीत. याबाबत ते म्हणाले की, नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत आणि यापुढेही राहतील. नितीश यांचे हे शब्द ऐकून मंचावर उपस्थित सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

## वरंध घाट कागदोपत्री बंद

जवळचा मार्ग असल्याने गेली अनेक वर्षापासून या मार्गावरून वाहतूक सुरू आहे हा घाट अरुंद असल्याने यापूर्वी अनेक अपघात देखील झाले आहेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील हा रस्ता आता महामार्ग बांधकाम विभागाच्या माध्यमातून रुंदीकरण होत आहे या रुंदीकरणासाठी करोडो रुपये मंजूर झाले आहेत मात्र गेली दोन वर्षापासून म्हाप्रळपासून सुरू असलेला हा रस्ता अद्याप महाडपर्यंत पूर्ण झालेला नाही. संथगतीने सुरू असलेल्या या कामामुळे नागरिकांचे मात्र प्रचंड हाल झालेले आहेत. सन २०२१ च्या अतिवृष्टीमध्ये माझेरी, पारमाची यादरम्यान घाट जागोजागी खचला होता तर अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्याने रस्ता बंद होता त्यानंतर करोडो रुपयांच्या भिंती उभारून हा मार्ग सुरू करण्यात आला. सद्यस्थितीत वाघजाई पासून ढालकाठीपर्यंत जागोजागी मातीचा भराव, संरक्षक भिंती उभ्या करण्यासाठी केलेले खोदकाम आणि छोट्या-मोठ्या आलेल्या दरडी आजही तशाच असल्याने घाटामध्ये धोकादायक स्थिती निर्माण झालेली आहे.

जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी एक महिन्यापूर्वी रस्त्याच्या कामाकरता हा घाट बंद राहील असा आदेश दिला होता मात्र प्रत्यक्षात घाट आजही सुरूच आहे. रस्त्यात टाकलेल्या दगडी मातीचा भराव बाजूला करून वाहन चालक घाटातून मार्ग काढत प्रवास करत आहेत. मे महिन्याच्या काळात आणि पावसाळ्याच्या तोंडावर घाटामध्ये ठिकठिकाणी संबंधित ठेकेदाराकडून खोदकाम करून संथगतीने काम सुरू आहे. घाटात केलेला खोदकामामुळे पावसाळ्याच्या काळात दगडी किंवा मातेचा भराव रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. घाट बंद करण्याचे हेतूने रस्त्यामध्ये मोठ्या दगडी ठेवण्यात आलेल्या आहेत मात्र या दगडी तात्पुरत्या स्वरूपात बाजूला केल्या गेल्या आहेत. घाटामध्ये पसरणाऱ्या धुक्यामधून या दगडी दिसल्या नाहीत तर अपघात होण्याची शक्यता आहे. यामुळे घाटातून वाहनांना प्रवास करण्यास हा मार्ग बंद करणे आवश्यक आहे.

**महामार्ग बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**

महाड मधील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांकडून महाड तालुक्यात सुरू असलेल्या रस्त्यांच्या बाबतीत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. तालुक्यातील किल्ले रायगड मार्ग, म्हाप्रळ पंढरपूर रस्ता त्याचप्रमाणे अंबडवे हे तिन्ही रस्ते आजही अर्धवट अवस्थेत संथ गतीने सुरू आहेत. या रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य असल्याने पाऊस पडल्यानंतर वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे ठिकठिकाणी रस्ते अर्धवट ठेवण्यात आलेले आहेत. अशाच पद्धतीने म्हाप्रळ-भोर-पंढरपूर या रस्त्यावर धोकादायक स्थिती आहे मात्र महामार्ग बांधकाम विभागाचे अधिकारी कार्यालयातील थंडगार एसीमध्ये बसण्यात धन्यता मानत आहेत. कागदपत्री हा घाट बंद असला तरी प्रत्यक्षात मात्र वाहनांची ये-जा सुरूच आहे यामुळे वाहन चालक आणि प्रवाशांचा जीव धोक्यात येऊ शकतो.

## रायगडचा निकाल ९६.७५ टक्के

या परीक्षेसाठी ३५ हजार ७२७ विद्यार्थी बसले होते. त्यानंतर विद्यार्थ्यांसह पालकांना परीक्षेच्या निकालाची उत्कंठा लागली होती. अखेर ही उत्कंठा सोमवारी संपली. दहावीचा निकाल पहाण्यासाठी काही विद्यार्थ्यांनी सायबर कॅफेमध्ये गर्दी केली होती. तर काही विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अधार घेत घरच्या घरी निकाल पाहीला.

दहावीच्या परिक्षेसाठी रायगड जिल्ह्यातून ३५ हजार ९१३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ३५ हजार ७२७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामधील ३४ हजार ५६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.७५ टक्के इतके आहे. एक हजार १५९ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत.

जिल्ह्यातील पनवेल, माणगांव, म्हसळा, महाड या तालुक्यांचा निकाल ९७ टक्केपेक्षा अधिक लागला असून उरण, पेण, अलिबाग, रोहा, श्रीवर्धन, पोलादपूर या तालुक्यांचा निकाल ९६ टक्केपेक्षा अधिक, तर तळा मुरूड तालुक्याचा निकाल ९५ टक्के पेक्षा अधिक, खालापूर, कर्जत या तालुक्यांचा निकाल ९४ टक्के पेक्षा अधिक आणी सुधागड तालुक्याचा निकाल ९२ टक्के लागला आहे. या पंधरा तालुक्यात ९७.७६ टक्के गुण मिळविण्यात पनवेल तालुका आघाडीवर आहे. त्या खालोखाल माणगाव (९७.६८ टक्के) तालुक्याचा समावेश आहे. मागील वर्षाच्या तुलनेत १.४७ टक्क्यांनी दहावी परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. मागील वर्षी जिल्ह्यातील ९५.२८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते.

**५४.३५ टक्के पुनर्परिक्षार्थी उत्तीर्ण**

रायगड जिल्ह्यातील ५४७ पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी परिक्षेसाठी अर्ज दाखल केले होते. यामधील ५३९ विद्यार्थी परिक्षेला सामोरे गेले. त्यापैकी २९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, २४६ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. पुनर्परिक्षार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ५४.३५ टक्के इतके आहे.

जिल्ह्यातील निकालावर दृष्टीक्षेप

| तालुके | मुले | मुली | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| पनवेल | ९६.९९ | ९८.५७ | ९७.७६ |
| उरण | ९६.०० | ९७.२० | ९६.५६ |
| कर्जत | ९३.८४ | ९६.०७ | ९४.९७ |
| खालापूर | ९३.१६ | ९५.८७ | ९४.५४ |
| सुधागड | ९१.९७ | ९३.२७ | ९२.५९ |
| पेण | ९६.३८ | ९७.०३ | ९६.६९ |
| अलिबाग | ९४.८५ | ९८.७४ | ९६.८१ |
| मुरूड | ९३.३१ | ९८.४६ | ९५.९९ |
| रोहा | ९५.२२ | ९७.९३ | ९६.५४ |
| माणगांव | ९७.७२ | ९७.६४ | ९७.६८ |
| तळा | ९२.५९ | ९८.०८ | ९५.५४ |
| श्रीवर्धन | ९४.९८ | ९७.४५ | ९६.२९ |
| म्हसळा | ९६.०६ | ९९.०३ | ९७.५६ |
| महाड | ९७.७३ | ९७.४१ | ९७.५८ |
| पोलादपूर | ९६.०५ | ९७.९७ | ९६.९४ |
| एकूण | ९५.८७ | ९७.६५ | ९६.७५ |

**यंदा दहावीचा निकाल चांगल्या पध्दतीने लागला आहे. चांगले गुण मिळवून विद्यार्थ्यांनी शाळेसह पालक व गाव व तालुक्याचे नाव लौकीक केले आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच जे विद्यार्थी अनुतीर्ण झाले आहेत. त्यांनी खचून न जाता पुन्हा नव्या उमेदीने अभ्यास करून यशस्वी व्हावे.त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.**

**-पंडित पाटील - माजी आमदार**

## २० हातरिक्षा चालकांचे नशीब चमकले

पण मुख्य विषयासंदर्भातच बोलावे त्यावर कोणाचाही आक्षेप नसल्याने सोडतचा मार्ग मोकळा झाला.दरम्यान ऋजुता प्रधान यांच्या एक लायसनवर दोन रिक्षा देता येत नसल्याने त्यांचा एक अर्ज बाद करण्यात आला.एकूण २३ अर्जदारांची सोडत घेण्यात आली.अर्णव शेखर जाधव या शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते पारदर्शक पणे सोडत काढण्यात आली यामध्ये बंद बरणी मधून एकएक चिठ्ठी काढत एकूण वीस चिठ्या बाहेर काढण्यात आल्या. शेवटच्या राहिलेल्या तीन चिठ्या बरणीतच ठेवण्यात आल्यानंतर बाहेर काढलेल्या चिठ्या खोलून त्यांची नावे पुकारण्यात आली.अशा एकूण वीस हातरिक्षा चालकांच्या नावाच्या चिठ्या पारदर्शकपणे काढण्यात आल्या.त्या सर्वानुमते मंजूर देखील करण्यात आल्या.

याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला दिला जाईल. याबाबत कोणाला काही तक्रार असेल तर त्यांनी मंगळवारपर्यंत लेखी स्वरूपात द्याव्यात त्या वरिष्ठांकडे सादर केल्या जातील.याप्रसंगी हातरिक्षा चालक मालक संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, सचिव सुनील शिंदे, सर्व हातरिक्षा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. नगरपालिकेचे लिपिक सदानंद इंगळे, लेखापाल अंकुश इचके यांनी पारदर्शक काम पाहिले. आता लवकरात लवकर विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व पर्यटकांना ई- रिक्षा सेवेचा लाभ मिळणार व स्थानिक भूमिपुत्रांना हक्काचा रोजगार मिळणार असून येथील ठेकेदारी हद्दपार होणार असे संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल यांनी सांगितले.

# पीएनपी शाळांचा १०० टक्के निकाल | पीएनपी संस्थेत आकृती वारे ९० टक्के गुण मिळवून प्रथम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमांमध्ये पीएनपी इंग्लिश मिडियम होली चाईल्ड स्कूल वेश्वी गोंधळपाडा शाळेची विद्यार्थिनी प्रथा रत्नाकर पाटील ८९.६० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. नियती विजय पाटील ८८.२० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर चेतना विजय बांगर ८८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

पीएनपीच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा निकाल १०० टक्के लागलेला असून मराठी माध्यमांच्या बहुतांशी शाळांचाही निकाल १०० टक्के लागला


प्रथा पाटील


नियती पाटील


चेतना बांगर


आकृती वारे


भक्ती घडशी


आर्यन महारनूर

आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या मराठी माध्यमांमध्ये कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक शाळा जांमरुंग शाळेचा विद्यार्थीनी आकृती सुरेश वारे ९० टक्के गुण मिळवून संस्थेत प्रथम आली. मुरुड तालुक्यातील माध्यमिक शाळा काकळघर शाळेची विद्यार्थिनी भक्ती विनोद घडशी ८८.६० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर अलिबाग तालुक्यातील माध्यमिक शाळा वेश्वी-गोंधळपाडा शाळेचा आर्यन समाधान महारनूर ८७.४० टक्के गुण मिळवून तृतीय आलेला आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. जयंत पाटील, खजिनदार नृपाल पाटील, कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




# अलिबागचा ९६.८१ टक्के निकाल

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत अलिबाग तालुक्याचा ९६.८१ टक्के निकाल लागला आहे.

अलिबाग तालुक्यातून दोन हजार ६९८ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेसाठी बसले होते. या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. त्यामध्ये दोन हजार ६१२ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. मुलींनी ९८.७४ टक्के व मुलांनी ९४.८५ टक्के गूण मिळविले आहेत. मुलींनी या परीक्षेत चांगली बाजी मारली आहे.

निकालाची तारीख जाहीर झाल्यापासून २७ मे रोजी दुपारचे एक कधी वाजतात याकडे पालकांसह विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. निकाल पहाण्यासाठी सर्वांची लगबग सुरु होती. उतीर्ण झाल्याचे समजताच पालकांसह विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. काही विद्यार्थ्यांना ८० टक्के पेक्षा अधिक गूण मिळवून देखील त्यांनी नाराजी व्यक्त केली. ९० टक्के पेक्षा अधिक टक्के गुण मिळण्याची अपेक्षा या विद्यार्थ्यांना होती. काही विद्यार्थी कोणताही क्लास न लावता चांगल्या गुणांना उतीर्ण झाले. काही विद्यार्थी वेगवेगळ्या प्रकारच्या शिकवणीतून उत्तम गुण मिळवून या परीक्षेत यश मिळविले. गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# उत्तीर्ण झाल्याने जेसीबीवरुन मिरवणूक

**| उरण | वार्ताहर |**

चिरनेर गावातील सार्थक अनंता नारंगीकर हा विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने गावातील मित्रांनी चक्क ढोलताशांच्या गजरात वाजत-गाजत मोटारसायकल व जेसीबीवरुन मिरवणूक काढली.

सध्याची तरुण पिढी ही अभ्यासाची कास न धरता मोबाईलमध्ये आपले लक्ष केंद्रित करून आपला वेळ, आयुष्य वाया घालवीत आहे. त्यात चिरनेर गावातील सार्थक अनंता नारंगीकर हा तरुण शाळेतील अभ्यासक्रमात लक्ष न देता मोबाईल व इतर बाबींकडे लक्ष केंद्रित करत होता. त्यामुळे तो दहावीच्या परीक्षेत नापास होणार असे त्यांच्याबद्दल मित्रांमध्ये तर्कवितर्क लावण्यात येत होते. परंतु, सार्थकने त्यांच्या मित्रांना वचन दिले की, मी दहावीची परीक्षा उत्तीर्ण होणार आहे. नुकताच दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला त्यात सार्थक नारंगीकर या विद्यार्थ्याला दहावीच्या परीक्षेत ५० टक्के गुण मिळाले. तो दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला. ही आनंदाची बातमी गावातील मित्रांना कळताच मित्रांनी ढोल ताशांच्या गजरात वाजत-गाजत सार्थकची मोटारसायकल व जेसीबीवरुन मिरवणूक काढली. यावेळी गावातील अनेक नागरीकांनी सार्थकचे अभिनंदन केले.



# नागांव हायस्कूलचा १०० टक्के निकाल

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीचा निकाल सोमवारी (दि.२७) जाहीर करण्यात आला. विद्यार्थ्यांना दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने निकाल पाहता आला. अलिबाग तालुक्यातील संचालक मंडळ हायस्कूल, नागाव या शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. नागांवमधील राधाई अजित सुतार ही मुलगी ८७.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आली. तसेच द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या उत्कर्षा संतोष शहाबाजकर हिला ८७ टक्के, तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या जुही जयेंद्र घरत हिला ८५ टक्के गुण मिळाले.

दहावीच्या वर्गशिक्षिका तनिष्का नाईक, सहशिक्षिका जान्हवी बनकर, वर्षा पाटील, मोहन पाटील यांनी विशेष मेहनत घेतली. तर शिक्षिका सुप्रिया पाटील, मंजूषा पाटील, जगदिश चोरघे, मनोज कासार, चंद्रकांत गिरी यांनी सहकार्य केले. नागाव हायस्कूल शाळेचा निकाल १०० टक्के लागल्याबद्दल शाळा समितीचे कार्याध्यक्ष एम.एन.पाटील तसेच मुख्याध्यापक अजित पाटील यांनी सहशिक्षकांचे विशेष कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# घरीच अभ्यास करून शाळेत प्रथम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



वडील अर्धांगवायूने अंथरुणाला खिळलेले, घरात कमावती आई अशी आर्थिक बेताची परिस्थिती असूनही कोणत्याही खाजगी शिकवणीला न जाता आपल्या बुध्दीच्या जोरावर आणि शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रेवदंडा कोएसो स.रा. तेंडुलकर शाळेची विद्यार्थिनी स्वरा संजय भोस्तेकर हिने दहावीत ८८.६० टक्के गुण मिळवून शाळेत पहिला येण्याचा मान मिळविला आहे. तिच्या यशात आई, वडील, शिक्षक आणि स्वतः स्वराचा मोठा वाटा आहे. स्वरा हिला इंग्रजी ८६, मराठी ९०, हिंदी ९३, गणित ८६, सायन्स आणि टेक्नॉलॉजी ८६, सामाजिक शास्त्र ८८ असे एकूण ५०० पैकी ४४३ गुण मिळाले आहेत.

वडिल हे अंथरुणाला खिळले असून आई कामावर जात असल्याने स्वरा हिने याही परिस्थितीत खंबीरपणे आणि एकाग्रतेने अभ्यास करून आपले ध्येय गाठले आहे. वडिलांचे आजारपण काढत वेळेचे सदुपयोग करून स्वरा हिने यश संपादन केले आहे. तिच्या यशामुळे सर्व स्तरातून स्वराचे अभिनंदन केले जात आहे.

# जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल स्कूलचे यश

**| रसायनी | वार्ताहर |**


हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मीडियम स्कूल नढाळ शाळेचा इयत्ता दहावीच्या बोर्डाचा एकूण निकाल १०० % एवढा लागला आहे. कुमारी दिशा मोहन फराट ८७.६०% गुण मिळवून प्रथम तर सुजितकुमार जीतमोहन झा ८०.२०% गुण मिळवून द्वितीय, तर कुमार कौस्तुभ दीपक कुंभार ७९.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. शाळेच्या एकूण निकालामध्ये १६ विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, तर प्रथम श्रेणीत ३ तर द्वितीय श्रेणीत १ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जे.एम. म्हात्रे, संस्थेचे प्रितम म्हात्रे, सचिव जे.के. मढवी, शाळा समितीचे चेअरमन दिलीप पाटील व मुख्याध्यापिका निशा पोळेकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्रमिक विद्यालयाची परंपरा कायम

**| खांब | वार्ताहर |**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे या विद्यालयाने आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. याही वर्षी विद्यालयाचा दहावीचा एकूण निकाल १०० % इतका लागला आहे. यावेळी रोहन विनायक गोसावी या विद्यार्थ्याने ९१.२० % इतके गुण संपादित करून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे, तर द्वितीय क्रमांक मानसी भरत नाकटे ८७.००%, तृतीय क्रमांक मानसी मारूती भोईर ८६ % यांनी पटकावले आहेत. विद्यार्थी वर्गाच्या या सुयशाबद्दल संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे, राम कापसे, धोंडू कचरे, धनाजी लोखंडे, वसंत मरवडे, दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विभागातील सर्वच क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी अभिनंदन व्यक्त करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.





# इंग्लिश स्कूलची सृष्टी प्रथम

**| म्हसळा | वार्ताहर |**

श्रीवर्धन तालुक्याचा एकूण निकाल ९८ टक्के लागला आहे.न्यू इंग्लिश स्कूलचा निकाल १००% लागला. अंजुमन हायस्कूलचा निकाल ९८% लागला आहे. न्यू इंग्लिश स्कूलची सृष्टी रुपेश वालवटकर ९२.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम, ओम प्रदिप कुलकर्णी ९२% द्वितीय तर, स्वयम सचिन शेट्ये ८८% तृतीय क्रमांक मिळवला आहे. अंजुमन हायस्कूल म्हसळाचा अब्दुल्लाह इस्माईल जळगावकर ९२.६०% गुण मिळवून प्रथम, जुनेद लांगे याने ९१.८०% द्वितीय आणि अहमद रजा हुसैन ९०.६०% गुण मिळवून विद्यालयात तृतीय क्रमांक मिळविला आहे.

# गव्हाणकर शाळेचा १००टक्के निकाल

**| माथेरान | वार्ताहर |**

प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर या शाळेचा दहावीचा निकाल १००% लागला आहे. माथेरान सारख्या दुर्गम भागात तीन ते चार किलोमीटर अंतरावर असलेल्या शाळेत जाऊन दहावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकांची थाप व शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. या शालांत परीक्षेस बसलेले सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. त्यामुळे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांसह शिक्षक वृंद आणि पालकांचे सुद्धा अभिनंदन केले जात आहे.

# राधिका मुरूड तालुक्यात प्रथम

**| मुरूड-जंजिरा | वार्ताहर |**

मुरूड येथील जंजिरा विद्या मंडळ संचालित सर एस. ए. हायस्कूलचा इयत्ता दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९५.३३ टक्के इतका लागला असुन या शाळेची कुमारी राधिका प्रशांत विरकुडने ९९ टक्के गुण मिळवुन मुरूड तालुक्यात प्रथम येण्याचा मान संपादन केला आहे. तसेच, कशीष अनिल राजभर ९३.६० % मिळवून द्वितीय तर अनुष्का आशिष दांडेकर ९२.६० % गुण मिळवून तृतीय आली आहे. तसेच, शाळेच्या सेमी इंग्लिश विभागाचा निकाल १०० टक्के लागला. यात ३६ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा आधिक गुण मिळविले



आहेत. १५० पैकी १४३ विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# नांदगाव विद्यालयात यश जंगम प्रथम

**| पाली/गोमाशी | वार्ताहर |**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव या विद्यालयाचा दहावीचा निकाल ९१.६६ टक्के लागला आहे. नांदगाव विद्यालयात शिक्षण घेणारा यश चंद्रशेखर जंगम हा गरीब कुटुंबातील विद्यार्थी असून त्याला ८५.२० टक्के गुण मिळवून नांदगाव विद्यालयात तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. त्याचे वडील गवंडी काम तर आई गृहिणी आहे. त्याने आपल्या खडतर आर्थिक परिस्थितीवर मात करून हे उज्वल यश मिळविले आहे. त्याच्या या यशाबद्दल प्राचार्य, शिक्षक वृंद आणि संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांनी विशेष आभार व्यक्त करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.



# डिकसळ विद्यालयाचा निकाल ९८.३४ टक्के

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील आदिजन विद्या प्रसारक मंडळाचे मा.भाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली-डिकसळ विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.३४ टक्के लागला.

प्रथम सोनिया बाळकृष्ण घारे ९२.००%, द्वितीय सोहम सुरेश लोंगले ८७.६०%, तृतीय भार्गवी नंदकुमार पालकर ८५.४०% मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

# रिलायन्स फाउंडेशनचा १०० टक्के निकाल

**नागोठणे :** नागोठणे येथील रिलायन्स फाऊंडेशन स्कूल या मराठी माध्यमाच्या शाळेतील दहावीच्या परीक्षेला बसलेले सर्व ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यामध्ये अनुक्रमे प्रथमेश साईनाथ वाव्हळ (९० टक्के), आर्या घासे (८२ टक्के) व पूर्वा कुथे (७८.२० टक्के) यांचा समावेश आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे रिलायन्सच्या नागोठणे युनिटचे अध्यक्ष शशांक गोयल, प्राचार्य योगेश परचुरे आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# उज्वल निकालाची परंपरा कायम

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्री.रा.ग.पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब या विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेच्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखून ठेवली असून विद्यालयाचा एकूण निकाल ९२.८५ % इतका लागला आहे. यावेळी श्रीयोग चंद्रकांत देशमुख या विद्यार्थ्यांने ९१.४०% गुण संपादित करून विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल हा नेहमीच चांगल्या पद्धतीने लागला जात आहे. तर, विद्यालयात द्वितीय क्रमांक सिद्धी तुकाराम धामणसे ९०.८० %, तृतीय क्रमांक आयुष्य अशोक शेळके ८९.६० %, चतुर्थ क्रमांक आर्या रमेश पिंपळकर ८८.४० % यांनी पटकावला आहे.

# एंजल स्कूलचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण

**नागोठणे :** नागोठण्यातील नीव सोशियल अँड एज्युकेशन ट्रस्टच्या होली एंजल स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. लावण्या रुपेश शेजवाळ ही विद्यार्थिनी ९५.२० टक्के गुण मिळवून शाळेत पहिली आली आहे, तर राहिया जावेद अधिकारी (९१.२० टक्के) व सृष्टी विलास शिरसे (९०.८० टक्के) या विद्यार्थिनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आणि होली एंजल्स स्कूलचे मुख्याध्यापक विजय मुल्कवाड, मुकेश मिसाळ, निलिमा राणे, राजन विळेकर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सुमीत पांडे शाळेत प्रथम

**माणगांव :** तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कुलने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १००% लागला असून सुमीत जयशंकर पांडे या विद्यार्थ्याने ९३.२०% इतके गुण संपादन करून शाळेत प्रथम आला. या शाळेतून अभय धनंजय पार्टे व नहुश संतोष भोनकर या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९२% गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, दिव्या दत्ताराम दिवेकर या विद्यार्थिनीने ९१.८०% गुण संपादन करीत तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून दहावी परीक्षेसाठी एकूण ४३ विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

# रातवड विद्यालयाची परंपरा कायम

**माणगाव :** तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचा निकाल सलग अकराव्या वर्षी शंभर टक्के लागला असून विद्यालयाच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या विद्यालयात प्रथम क्रमांक कस्तुरी देवकर ८७.८०%, द्वितीय क्रमांक तन्वी महाडीक ८५.८०%, तर तृतीय क्रमांक विवेक सकपाळ ८५.४०% यांनी पटकावत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला. या शाळेतून परीक्षेला यावर्षी एकूण २९ विध्यार्थी बसले होते. हे सर्व विध्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन विशेष श्रेणीमध्ये २० विध्यार्थी, तर प्रथम श्रेणीत ९ विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# अग्रवाल विद्यामंदिरचा ९६.५९ टक्के निकाल

**नागोठणे :** कोएसोच्या नागोठण्यातील गु.रा. अग्रवाल विद्यामंदिरचे इयत्ता दहावीतील १४७ पैकी १४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने शाळेचा निकाल ९६.५९ टक्के लागला आहे. शाळेतील आंचल नामदेव मढवी व श्रेया माधव भोईर या दोन विद्यार्थीनी प्रत्येकी ८७.८० टक्के गुण मिळवून शाळेत संयुक्तरीत्या प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. यज्ञा रघुनाथ शिर्के (८७.६० टक्के) व संस्कार तुळशीराम तेलंगे (८५ टक्के) हे विद्यार्थी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

# कशेळेचा निकाल ९७.५६ टक्के

**कर्जत :** तालुक्यातील दुर्गम भागातील आदिजन विद्या प्रसारक मंडळाचे भाऊसाहेब राऊत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कशेळे दहावीचा निकाल ९७.५६ टक्के लागला आहे. परीक्षेस १६४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी सर्व १६० उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम भूमी शंकर घरत ९१.४० टक्के, द्वितीय भैरवी नरेंद्र मते ९०.४० टक्के तर तृतीय पायल शिवाजी धुळे ८६.८० टक्के मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

# आपटा शाळेत अनमोल प्रथम

**आपटा :** दहावीत प्रथम क्रमांक अनमोल विनायक सावंत ७४.६०%, व्दितीय क्रमांक हर्षदा अनंत चव्हाण ७२.४०%, तृतीय क्रमांक सार्थक मोहन मेहेतर ७१.४०%, चौथा क्रमांक स्वराज समीर भालेकर ७१.२०% तर पाचवा क्रमांक रागीनी श्रवण ७०.४० यांनी पटकावला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक व सर्व सहकारी व ग्रामस्थांनी केले आहे.

# खारपाटील विद्यालयात मुलींची बाजी

**चिरनेर :** येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक शाळेचा निकाल ९७.२९ टक्के लागला. यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. ७४ विद्यार्थ्यांपैकी ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, तर दोन विद्यार्थी नापास झाले. मृणाली मनोज म्हात्रे ८३.८० टक्के गुण विद्यालयात प्रथम, विघ्नेश विशाल पाटील ८२.८० टक्के दुसरा, तर सिद्धी सुरेश गावंड, दिशा गणेश चिर्लेकर यांना ८०.६० टक्के तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेसह मुख्याध्यापक, शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# अति झाले अन् हसू आले

सनरायझर्स हैदराबादला हरवून कोलकाता नाईट रायडर्सने यंदाचे आयपीएल विजेतेपद जिंकले. ज्या हैदराबादने ट्रेव्हिस हेडच्या जिवावर याच स्पर्धेत अनेकदा अडीचशे किंवा पावणेतीनशेचे टप्पे गाठले त्याच संघाने अंतिम सामन्यात या स्पर्धेतली नीचांकी धावसंख्या नोंदवली. यामध्ये क्रिकेटमधील अनिश्चितता वगैरेंचा भाग आहेच, पण भयानक उन्हाळा आणि प्रदीर्घ काळ चाललेली स्पर्धा यांचाही त्यात वाटा आहे. ऑस्ट्रेलियाचा पॅट कमिन्स हैदराबादचा कर्णधार होता. त्याने या स्पर्धेत गोलंदाजी व फलंदाजीत उपयुक्त कामगिरी केली. याच कमिन्सने काही महिन्यांपूर्वी रोहित शर्माच्या भारताला विश्वकरंडकाच्या अंतिम फेरीत अहमदाबादमध्ये हरवले होते. त्यावेळी भारताने साखळी स्पर्धेतील सर्व सामने जिंकले होते. त्यामुळे अंतिम सामना भारतच जिंकणार अशी सर्वांना आशा होती. पण कमिन्स व हेडने त्यावर पाणी ओतले होते. कमिन्सने इंग्लंडविरुध्दची मालिकाही जिंकून दिली होती. त्यामुळे आता हैदराबादलाही हीच जोडी अंतिम लढतीत विजय मिळवून देईल असे सर्वांना वाटत होते. पण त्यांना कोलकाताचा कर्णधार श्रेयस अय्यर भारी ठरले. अर्थात, कोलकाताच्या या विजयात ऑस्ट्रेलियाचाच मिशेल स्टार्क हा स्टार ठरला. त्यानेच हेडला बाद करून पहिला धक्का दिला व नंतर एकूण तीन बळी घेतले. कोलकाताचा संघ बऱ्यापैकी समतोल होता. त्यांच्यात संघापेक्षा भारी असलेला विराट कोहली किंवा धोनी यांच्यासारखा कोणी सुपरस्टार नव्हता. सर्वच जण आपापली कामगिरी बजावत होते. वीस षटकांच्या सामन्यात झटपट केलेल्या वीस-तीस धावाही उपयुक्त ठरत असतात. शिवाय, एखादा बळी वा झेलही निर्णायक ठरतो. खुद्द श्रेयसची या मोसमातील कामगिरी फार चांगली नव्हती. पण त्याने संघाला नीट दिशा दिली. त्यांचा सुनील नरेन हा तर आश्चर्यकारक खेळाडू आहे. तो मूळचा स्पिनर. त्यातही त्याच्या एक्शनबाबत विवाद झाले. पण गेल्या काही वर्षांपासून तो धडाकेबाज फलंदाज म्हणून उदयाला आला. यंदा त्याने ४८८ धावा आणि १७ बळी घेतले व तो स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.

### संघ घडवणे ही कला

मुंबई इंडियन्स व चेन्नई सुपरकिंग्ज हे या स्पर्धेतले सर्वात यशस्वी संघ आहेत. प्रत्येकी पाच वेळा त्यांनी विजेतेपद मिळवले आहे. चेन्नईच्या संघाला महेंद्रसिंग धोनीमुळे एक वलय प्राप्त झाले आहे. साध्या खेळाडूंच्या मदतीने धोनी उत्तम नियोजन करून विजय मिळवून देतो असा त्याचा लौकिक आहे. पण आता त्याचे वय झाले. तो कर्णधार नव्हता. त्यानेच निवडलेल्या ऋतुराज गायकवाडवर ही जबाबदारी सोपवण्यात आली होती. गायकवाडने फलंदाज व कर्णधार म्हणून उत्तम कामगिरी केली. पण एकूण संघाची कामगिरी शेवटच्या टप्प्यात ढेपाळली. त्याचा हुकुमी एक्का अजय जडेजा अपयशी ठरला. शिवाय त्यांचा दीपक चहरसारखा मारक गोलंदाज जायबंदी झाला होता. मुंबईचा रोहित शर्माही आता थकल्यासारखा वाटतो. थोड्या धावांच्या चमकदार खेळी करून तो अनेकदा बाद झाला. सूर्याचा जितका गवगवा झाला त्या मानाने तो खेळला नाही. मुंबईची गोलंदाजीही सुमार होती. राजस्थान रॉयल्सने स्पर्धेत दहा विजय मिळवून मोठी भरारी घेतली होती. मात्र अंतिम फेरीत येईपर्यंत रातोही शेवटच्या काळात माघारी गेला. तरीही त्यांची सांघिक कामगिरी उत्तम राहिली. मात्र एकदिवसाच्या विश्वचषकात भारताला जसा खेळ उंचावता आला नव्हता नेमके तेच राजस्थानचेही झाले. बंगलोरच्या रॉयल चॅलेंजर्सची कथा दक्षिण आफ्रिकी संघासारखी आहे. त्यांचाच फाफ डुप्लेसी यंदा त्यांचा कर्णधार आहे. कागदावर ते भारी वाटतात. ते दमदार कामगिरीही करतात. पण मोक्याच्या वेळी ते कच खातात. यंदाही प्लेऑफच्या लढतीत राजस्थानने त्यांना चारीमुंड्या चीत केले. लखनौ, गुजरात वगैरेंच्या संघातील कोट्यवधींच्या बोली लावलेल्यांनी पार निराशा केली. एकूण संघ घडवणे ही एक वेगळी कला आहे. त्यासाठी मालकांच्या संयमाची व धोनीसारख्या कौशल्याची गरज असते. प्रत्यक्षात लखनौचा मालक गोएंकाने कर्णधार राहुल याच्यासोबत जाहीर भांडण करून आपला संघ का हरतो आहे याचे जणू कारणच जगासमोर आणले.


### आता ब्रेक घ्या

जवळपास तीन महिने अशी प्रदीर्घ ही स्पर्धा चालते. भारतातल्या उन्हाळ्यामध्ये इतका काळ वर्षानुवर्षे असा खेळ चालवला की त्यातली गंमत निघून जाणार हे ठरलेले आहे. यंदा त्याचे प्रत्यंतर आले. क्रिकेट अती झाल्याची तक्रार भारतात पूर्वीपासून होतीच. पण आयपीएलने क्रिकेटचे अगदी अजीर्ण होते आहे. शिवाय, त्यातली अनपेक्षितता संपत चालली आहे. यंदा सुरुवातीच्या सर्व सामन्यांमध्ये प्रचंड मोठमोठ्या धावसंख्या उभारल्या गेल्या. मात्र नंतरच्या टप्प्यात खेळाडू थकले, उष्मा वाढला, खेळपट्ट्या मंद झाल्या आणि धावसंख्या कमी होत गेल्या. पूर्वीच्या क्रिकेटमध्ये षटकार ही अपूर्वाई असे. अगदी एक दिवसीय सामन्यांमध्ये देखील षटकार मोजके लगावले जात. पण आता या स्पर्धेत षटकारांचा इतका पाऊस पडतो की एखादी गावठी स्पर्धा पाहतो आहे की काय असे वाटावे. गोलंदाजांवर वाईड, बाऊन्सर इत्यादींबाबत बंधने खूप आहेत. त्यामानाने फलंदाजांना मोकळीक आहे. मात्र यामुळे हा खेळ एकारला आहे. शिवाय, दरवर्षी रतीब घातल्याप्रमाणे पैशांसाठी सर्व खेळाडूंनी खेळणे यामुळे यामध्ये यांत्रिकता येऊ लागली आहे. खेळ ही एक मजा असायला हवी. त्याचा धंदा झाला की काय होते याचे आयपीएल हे उत्तम उदाहरण आहे. त्यातच आता तुमची टीम निवडा किंवा वेगवेगळ्या गोष्टींवर सट्टा लावा हे सर्व अधिकृत झाले आहे. या जुगारांमध्ये हजारो कोटींची उलाढाल होते आहे. किंबहुना, या जुगारासाठीच खेळाडू मैदानावर घाम गाळतात असे चित्र तयार झाले आहे. यात मूठभर मालक आणि लॉटरीवाले यांचे भले होते आहे. मात्र खेळाचे वाटोळे होते आहे. लवकरच अमेरिकेत वीस षटकांचा विश्वकरंडक होतो आहे. वास्तविक आयपीएल भरवणारा भारत हा स्पर्धेतला प्रबळ दावेदार असायला हवा होता. पण तसे म्हणणे कठीण आहे. अति झाले आणि हसू आले अशी स्थिती आहे.

---

**विचार**

# चाबहार अमेरिकेला का चावतोय?



***आधी चाबहार बंदर प्रकल्पाला पाठिंबा देणाऱ्या अमेरिकेचे पित्त आता का खवळले, अत्यंत चांगले संबंध असताना भारताला इशारा देण्यापर्यंत अमेरिकेची मजल का गेली, गेल्या वर्षभरात चीन आणि इराणचे संबंध चांगले झाले असताना अमेरिका का नाराज होत नाही, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे जाणून घ्यावी लागतील. तरच चाबहार बंदराचे महत्त्व आणि अमेरिकेची नाराजी ओढवूनही भारत या करारावर ठाम का आहे, हे समजू शकेल.***

**प्रा.डॉ. विजयकुमार पोटे**

चीनने चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (सीपीईसी)अंतर्गत पाकिस्तानमध्ये ग्वादर बंदर विकसित करण्याचा निर्णय घेतला. हा प्रकल्प जवळपास ४५ अब्ज डॉलरचा आहे. सामरिकदृष्ट्या भारताला शह देण्यासाठी या प्रकल्पाचा वापर होणार आहे. मात्र चीन आणि पाकिस्तानदरम्यान करार होण्याआधीच भारताने इराणशी चाबहार बंदर विकसित करण्यासंबंधी चर्चा केली होती. अफगाणिस्तान, इराण, रशिया किंवा तिकडच्या अन्य देशांशी व्यापार करायचा झाला तर मध्ये पाकिस्तान आहे. या पार्श्वभूमीवर अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात इराणबरोबर चर्चा झाली. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असताना वाटाघाटी झाल्या, करार झाला; परंतु मध्यंतरीच्या काळात इराणवर अमेरिकेसह जगाने निर्बंध घातले होते. त्यामुळे हा करार पुढे जाऊ शकला नाही. चाबहार बंदर झाले तर भारत आणि इराणमधील अंतर मुंबई-दिल्ली अंतरापेक्षा कमी होईल, मध्यपूर्वेतील व्यापार वाढेल तसेच सामरिकदृष्ट्या या बंदराच्या माध्यमातून चीन आणि पाकिस्तानला शहही देता येईल. आता इराणवर अमेरिकेचे असले तरी जगाचे निर्बंध नाहीत. या पार्श्वभूमीवर एकीकडे देशात लोकसभेची निवडणूक सुरू असताना दुसरीकडे भारताने इराणसोबत चाबहार बंदर विकसित करण्याचा करार केला. सर्वसाधारणतः निवडणुकीच्या काळात असे करार होत नाहीत; परंतु भारतात कोणतेही सरकार आले तरी परराष्ट्र धोरणात सातत्य राहते, हा इराणचा अनुभव आहे. त्यामुळे या करारावर सह्या करण्यात आल्या. चाबहार बंदराबाबत भारत आणि इराण यांच्यात झालेला ताजा करार अतिशय महत्त्वाचा आहे. यामुळे परस्परसंबंधांना नवी उंची मिळेलच; खेरीज 'कनेक्टिव्हिटी'च्या दृष्टिकोनातूनही ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरेल.

दोन्ही देशांमधील संबंधित मंत्र्यांच्या उपस्थितीत 'इंडिया पोर्टस् ग्लोबल लिमिटेड' (आयपीजीएल) ही भारतातील सार्वजनिक कंपनी आणि इराणची 'पोर्ट आणि मेरिटाइम ऑर्गनायझेशन' यांच्यात हा करार झाला. त्यानुसार भारतीय कंपनी चाबहार बंदराच्या आधुनिकीकरणात सहभागी होईल. बेहेश्ती पोर्ट चाबहारच्या विकासासाठी पुढील दहा वर्षांमध्ये अंदाजे ३७० दशलक्ष डॉलर खर्च करेल. त्याचे व्यवस्थापन आणि संचालनदेखील करेल. या रकमेपैकी सुमारे १२० दशलक्ष डॉलर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवले जातील तर उर्वरित २५० दशलक्ष डॉलर इराणला कर्ज म्हणून दिले जातील. तसे पाहिले तर चाबहार बंदर विकसित करण्याचा भारताचा हेतू अनेक दशके जुना आहे. हे बंदर इराणच्या दक्षिण-पूर्व किनाऱ्यावर असून तिथून दक्षिण अफगाणिस्तानचा संपूर्ण प्रांत अफगाणिस्तान-इराण सीमेवर असणाऱ्या झारंज शहरात उघडतो. या बाबी लक्षात घेऊन २००२ मध्ये वाजपेयी सरकारने दूरदृष्टीने अफगाणिस्तानला झारंज ते दिलाराम हा रस्ता तयार करण्यासाठी मदत केली होती. हा रस्ता चाबहार ते अफगाणिस्तान आणि अफगाणिस्तानमार्गे मध्य आशिया, पुढे रशिया आणि युरोपीय देशांना जाण्याचा मार्ग खुला करतो. इराणच्या सहभागासह आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरदेखील भारताच्या व्यावसायिक हितांना पुढे नेण्यात मोठी भूमिका बजावेल. आपण विसरता कामा नये की पाकिस्तान निर्यातीसाठी पंजाब, खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तानमार्गे अफगाणिस्तानचा मार्ग कधीही उघडणार नाही. पाकिस्तान आणि चीन यांचाही अफगाणिस्तानला चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरशी जोडण्याचा मानस आहे. त्याचा दुवा ग्वादरमार्गे असेल.

अशा परिस्थितीत चाबहार बंदराचा विकास आर्थिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून स्वाभाविकपणे आपल्या हिताचा आहे. आपले धोरणात्मक हीतही याच्याशी जोडलेले आहे. असे असताना शाहीद बेहेश्ती पोर्ट-चाबहार करारानंतर अमेरिकेने भारताला इशारा दिला. इराणला सहकार्य करणाऱ्यांनी अमेरिकेने त्या देशावर लादलेल्या निर्बंधांची आठवण ठेवावी, असे सूचित करणारा हा गर्भित इशारा आहे. खरे तर २०१६ मध्ये भारत आणि इराण यांच्यामध्ये अमेरिकी निर्बंधांना न जुमानता चाबहार बंदराचा करार झाला होता. त्या वेळी अमेरिकेने जाहीर केले होते की चाबहारच्या विकासासाठी भारताचे सहकार्य निर्बंधांच्या कक्षेबाहेर राहील. भारत आणि अमेरिकेची मैत्री आहे तसेच दक्षिण आशियात चीनला शह देण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज आहे. असे असले तरी भारत अमेरिकेच्या ओंजळीने पाणी पित नाही. आपले स्वतंत्र धोरण आहे. आपण अन्य देशांशी कसे आणि किती संबंध ठेवावेत, या विषयात अमेरिकेने लुडबूड करण्याचे काहीच कारण नाही. भारताने रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र घेतली, तेव्हाही अमेरिकेने परिणामांचा इशारा दिला होताच. मात्र आता भारत अशा फ‍काच्या धमक्यांना भीक घालत नाही, हे अमेरिकेला कळायला हवे होते. निर्बंध असतानाही भारतासह जगातील अनेक देशांनी रशियातून कच्चे तेल खरेदी केले आहेच. अजूनही ही खरेदी सुरूच आहे.

असे असले तरी अमेरिकेची नाक खुपसण्याची सवय काही जात नाही. अमेरिकेच्या प्रवक्त्यांच्या वक्तव्यात कठोरपणा नसल्यामुळे कदाचित भारत आणि अमेरिकेदरम्यान या मुद्द्यावर पडद्याआड चर्चा झाली असण्याचीही शक्यता आहे. देशांतर्गत दबावामुळे आणि या वर्षी पार पडत असणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीमुळे अमेरिकेने हे विधान केले असण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे ही बाबही लक्षात घ्यायला हवी. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन प्रशासनाने इराणबाबत अतिशय कठोर भूमिका घेतली आहे. इराण हा पश्चिम आशियातील मोठा देश आहे. इराणचे भारतासोबतचे राजकीय संबंध, विशेषतः ऊर्जा क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरले आहेत. तथापि, हेदेखील सत्य आहे की अमेरिकेच्या निर्बंधांमुळे अनेक भारतीय कंपन्यांनी इराणपासून अंतर राखले होते. कंपन्यांनी तिथे गुंतवणूक करणे टाळलेले होतेच पण इराणी कंपन्यांशी भागीदारी करण्यासदेखील कंपन्या नाखूश होत्या. असे केल्याने अमेरिकन कंपन्यांशी असणारे संबंध किंवा अमेरिकेतील त्यांच्या कामकाजावर परिणाम होऊ शकण्याची भीती त्यांना वाटत होती. असे असताना भारत सरकारनेही इराणशी संबंध जपताना अमेरिकेच्या निर्बंधांचा विचार केला आहे. यामागील कारण म्हणजे भारताचे सर्वांगीण हित इराणपेक्षा अमेरिकेशी जास्त जोडलेले आहे. तरीही याचा अर्थ इराण आणि भारताने आपले संबंध पुढे नेऊ नयेत, असा होत नाही.

या कराराला अंतिम स्वरूप दिल्यानंतर अमेरिकेपासून चीन तसेच पाकिस्तानपर्यंत विविध देश चिंतेत पडले आहेत. मूलतः चाबहार हा बलुची वाक्प्रचार 'चाहर बहार'चे छोटे रूप आहे. यामध्ये चाहर म्हणजे चार आणि बहार म्हणजे वसंत. या शब्दाचा अर्थ समजून घेतला तर वर्षातील चारही ऋतू वसंत ऋतूसारखे असणारा भाग म्हणजे चाबहार. परदेशातील एखाद्या बंदराचे व्यवस्थापन भारताकडे घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे चाबहार बंदर इराणच्या दक्षिणेकडील किनारपट्टीवर सिस्तान-बलुचिस्तान प्रांतात आहे. या स्थानामुळेच ते भारतासाठी खूप खास आहे. पाकिस्तानच्या ग्वादर बंदरापासून ते केवळ ७२ किलोमीटर अंतरावर आहे. चाबहार हा 'इंटरनॅशनल नॉर्थ-साउथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर' (आयएनएसटीसी) चा एक भाग आहे. हा एक बहु-मॉडेल वाहतूक प्रकल्प आहे. हा प्रकल्प हिंद महासागर आणि पर्शियन गल्फला रशियातील सेंट पीट्सबर्ग मार्गे इराण आणि उत्तर युरोपला कॅस्पियन समुद्राशी जोडतो. चीन आणि पाकिस्तान अस्वस्थ असण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. चाबहार बंदराबाबत भारत आणि इराणमधील कराराची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पाकिस्तानच्या ग्वादर बंदर आणि चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'ला भारताने दिलेले उत्तर म्हणूनच याकडे पाहिले जात आहे. भारत गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या महत्त्वाकांक्षी 'नेक्स्टल ऑफ डायमंड' प्रकल्पावर काम करत आहे. या प्रकल्पासाठीही चाबहार बंदर अत्यंत महत्त्वाचे आहे. चीनला सर्व बाजूंनी घेरणे हा या रणनीतीचा उद्देश आहे. या रणनीतीअंतर्गत भारत आपल्या नौदल तळांचा विस्तार करत असून चीनच्या रणनीतींना तोंड देण्यासाठी सामरिकदृष्ट्या मजबूत देशांशी संबंध सुधारत आहे. भारताच्या या रणनीतीमध्येही चाबहार हा अत्यंत महत्त्वाचा थांबा आहे. खेरीज चाबहार कॉरिडॉरअंतर्गत भारत, इराण, अफगाणिस्तान, आर्मेनिया, अझरबैजान, रशिया, मध्य आशिया आणि युरोपमधील मालाची वाहतूक करण्यासाठी जहाज, रेल्वे आणि रस्त्यांचे ७,२०० किलोमीटर लांबीचे जाळे तयार केले जाणार आहे. या मार्गामुळे भारताचा युरोपमध्ये प्रवेश सोपा होणार आहे. अशा एक ना अनेक अर्थांनी हा करार महत्त्वाचा आहे.

---

**आजकाल**

# खबरदार, सिस्टीम हा शब्द उच्चारलात तर!

**संजीव चांदोरकर**

खबरदार कोणी ''सिस्टीम'' हा शब्द जरी उच्चारला तर; ''सिस्टीम'' अशी काही नसते,

ज्या असतात त्या व्यक्तिगत शोकांतिका असतात !

मुंबईतील फलक पडला; इतके मेले.

डोंबिवलीतील रासायनिक कारखान्यात आग लागली; तितके मेले.

राजकोटमध्ये गेमिंग झोन मध्ये आग लागली, इतके मेले.

दिल्लीत लहान मुलांच्या इस्पितळाला आग लागली, तितकी मुले मेली.

या फक्त गेल्या काही दिवसातील मथळ्याच्या घटना;

एकाचवेळी मरणाऱ्यांची भरपूर संख्या असेल तरच दखलपात्र घटना होते; ज्या अशा घटनांमध्ये किरकोळ माणसे मरतात त्यांची तर कोणी दखल देखील घेतली जात नाही.

लक्षात घ्या या सगळ्या मोठ्या शहरातल्या/महानगरतल्या दुर्घटना म्हणून त्याच्या बातम्या तरी होतात.

ग्रामीण भागात, आदिवासींच्या जंगलात; पहाडी, दुर्गम भागात कोण आणि किती मरतात त्याची सरकार दरबारी देखील आकडेवारी दर्ज होत नसेल.

कोरोना काळ हे अलीकडचे उदाहरण

काल नदी वेगाने वाहतच असते; आपण त्यात गटांगळ्या खात वाहत असतो; आणि सगळ्या घटना विस्मृतीत जातात, अशाच नवीन घटना घडेपर्यंत!

या सगळ्या घटनांकडे व्यक्ति गत शोकांतिका म्हणून बघितले जाते ; बाहेरच्या लोकांकडूनच नाही, तर अशा घटनांमध्ये होरपळलेल्या लोकांकडून ''आपले नशीबच फुटके'' अशी स्वतःची समजूत घातली जाते.

पण अशा घटनांमध्ये बळी गेलेल्या नागरिकांचे मृत्यू/त्याच्या जवळच्या रक्ताच्या लोकांच्या यातना कारणी लागायच्या असतील तर भविष्यात अशा टाईपच्या घटना होणार नाहीत हाच ॲप्रोच हवा.

त्यासाठी अशा घटना वाटतात तशा सुट्या सुट्या नाहीत, त्यामध्ये एक प्रकारचा रीकरींग पॅटर्न आहे/सारखेपणा आहे हे मनात नोंदवावे लागेल.

अशा घटनांची मुळे, अतिशय गुंतागुंतीच्या, एका पातळीवर अमूर्त असणाऱ्या सिस्टीममध्ये आहेत अशा निष्कर्षावर यावे लागेल.

या सगळ्यात सामायिक आहे आपल्या सार्वजनिक संस्था गेल्या ४० वर्षात पोकळ करण्यात आल्या आहेत;

देशात, अर्थव्यवस्थेत अनेक गोष्टी अशा आहेत त्या शुद्ध सार्वजनिक हेतू नेच (पब्लिक पर्पज) चालवल्या जाऊ शकतात; सर्व सार्वजनिक संस्था सक्षम करणे हे सर्वांच्या हिताचे आहे. सार्वजनिक संस्था कमकुवत असणे, त्यासाठी निधी नसणे, गव्हर्नन्सची गुणवत्ता, उपलब्ध नवं तंत्रज्ञानाचा उपयोग, ज्यासाठी पुन्हा भांडवल लागते, चांगला पगार आणि निर्णय स्वातंत्र्य देऊन प्रशिक्षित प्रोफेशनल्सना आमंत्रित करणे अशा अनेक गोष्टी करता येतील. पण सार्वजनिक चर्चा विश्वात हे विषयच येत नाहीत.

प्रत्येक दुर्घटनेकडे सुटी सुटी घटना म्हणून बघणे,

प्रत्येक दुर्घटनकडे मानवी शोकांतिका म्हणून बघणे,

प्रत्येक दुर्घटनेत होरपळलेल्या व्यक्तींना/कुटुंबाना दोष देणे,

प्रत्येक गोष्टीत भ्रष्ट अधिकारी, नोकरशाही/राजकरणी लोकांचे साटेलोटे अशी घासून गुळगुळीत झालेली कारणे देणे.

हा व्यक्तिकेंद्री दृष्टिकोन फक्त गंभीर दुर्घटनांपुरता मर्यादित नसतो; अगदी माणसांच्या दारिद्र्याला त्या माणसाचा आळशीपणा, न शिकण्याची तयारी, कमी बुद्धी असणे, कष्ट न करता दीपणाची सवय, सर्व काही सरकारने केले पाहिजे हा आग्रह... हे कारणीभूत आहे हा विचार खूप खोलवर रुजवला गेला आहे.

याची मुळे शेकडो वर्षांच्या मेंदूच्या वायरिंगमध्ये आहेत; जाती धर्माच्या शिकवणीपासून ते आताच्या नवउदारमतवादाच्या शिकवणीपर्यंत प्रत्येक व्यक्तीचे आताचे आयुष्य त्या व्यक्तीच्या मागच्या जन्मीच्या पाप पुण्यावर ठरते; शेवटी नशीब म्हणून काहीतरी आहेच, ते प्राक्तन प्रत्येकाने स्वीकारणे हेच खरे.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यातील घटनांची/राहणीमानाची जबाबदारी स्वतः घेतली पाहिजे; कष्ट करून, शिकून कोणीही कोठेही पोचू शकतो.

ज्या दिवशी कोट्यवधी नागरिक त्यांच्या आयुष्यात. त्यांच्या आजूबाजूला घटनांमध्ये असणारे पॅटर्न हुडकून काढतील, ज्यादिवशी सिस्टीम केंद्री विचार करण्याची सवय लावतील. त्यादिवशी बर्फ वितळायला सुरुवात होईल.

---

**लोकसंसद**

### विजेत्यांवर कोट्यवधींच्या बक्षीसांची खैरात

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील कोलकाता नाइट रायडर्सने आयपीएलच्या १७ व्या मोसमातील एकतर्फी झालेल्या अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा ८ राखून सहजतेने पराभव केला आणि दहा वर्षानंतर तिसऱ्यांदा आयपीएलचे विजेतेपद पटकावले. क्रिकेट विश्वातील सर्वाधिक श्रीमंत असलेल्या या स्पर्धेतील विजेत्या संघांवर आणि सर्वोत्कृष्ट खेळाडूंवर कोट्यवधींच्या रकमांच्या बक्षिसांचा वर्षाव झाला आहे. अंतिम विजेत्या कोलकाता नाइट रायडर्स संघाला २० कोटी रुपयांचे बक्षिस मिळाले आहे. उपविजेत्या सनरायझर्स हैदराबादला १२.५ कोटी, तिसऱ्या स्थानावर असलेल्या राजस्थान रॉयल्स संघाला ७ कोटी रुपये तर चौथ्या स्थानावरील आरसीबी संघाला ६.५ कोटी रुपयांचे बक्षिस मिळाले आहे. यंदाच्या हंगामात सर्वाधिक ८४१ धावा करणाऱ्या विराट कोहलीला आणि २४ गडी बाद करणाऱ्या हर्षल पटेलला त्यांच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी प्रत्येकी १० लाख रुपयांचे बक्षिस देऊन गौरविण्यात आले. तर स्पर्धेचा उदयोन्मुख खेळाडू नितीश कुमार रेड्डी याला १० लाख रुपयांचे बक्षिस मिळाले. यंदाच्या पुरस्कारांचे खास वैशिष्ट्य म्हणजे स्पर्धेत प्रथमच सर्वोत्कृष्ट खेळपट्टी आणि मैदानाला ५० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात आला आणि हा पुरस्कार हैदराबादच्या राजीव गांधी इंटरनॅशनल स्टेडियमने जिंकला.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२८ मे**

**१८७५:-** शेक्सपिअरच्या नाटकांचे अनुवादक, सत्चरित्र लेखक दत्तात्रेय महादेव खरे यांचा जन्म. 'मला माहित असलेले साधुसंत', 'महिपतीचा गोष्टरुप भक्तविजय', 'श्री अष्टविनायक' इत्यादी पुस्तके लिहिली. **१८८३:-** 'हिंदुपदपातशाही', 'सहा सोनेरी पाने', '१८५७ चे स्वातंत्र्यसमर', 'जोसेफ मॅझिनीचे चरित्र' असे प्रेरक 'इतिहासकथन', 'गांधीगोंधळ', 'मोपल्यांचे बंड अथवा मला काय त्याचे' यांतून प्रचलित राजकारणातील टीका, जात्युच्छेदक निबंध, भाषा - शुध्दी लेख व विज्ञाननिष्ठ निबंध, हिंदुराष्ट्रदर्शन अशी सैध्दांतिक पुस्तके, 'माझी जन्मठेप', 'लंडनची बातमीपत्रे' आदी प्रेरणादायी, संघर्षशील व अनुभवाधारित लेखन, 'कमला', 'गोमांतक' ही खंड काव्ये, अनेक स्फुट कविता आणि 'संन्यस्त खड्ग', 'उःशाप', 'उत्तरक्रिया' ही संगीत नाटके अशा उत्तुंग ग्रंथसंपदेचे कर्ते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म. **१८८३ :** क्रांतिकारक असणारे वि.दा.सावरकर यांनी लेखक कवी, कथा कादंबरी, निबंधकार, नाटककार, राजकीय विचारवंत या प्रकारच्या साहित्यांच्या क्षेत्रातही मुशाफिरी केली. त्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी झाला. वकिलीची पदवी संपादन करणाऱ्या सावरकरांनी लंडनमध्ये बॅरिस्टरचा अभ्यास करायला गेले असता अस्सल कागदपत्रांच्या आधारावर १८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम हा प्रेरणादायी ग्रंथ लिहिला. याशिवाय शिखांचा इतिहास, मॅझिनीचे आत्मचरित्र आदी पुस्तके त्याच्या नावावर आहेत. 'हिंदुत्व हा ग्रंथ 'मराठा' या टोपणनावाने प्रसिद्ध झाला. तसेच हिंदूत्वासंबंधीच्या चिंतनातून 'हिंदूपदपातशाही' या ग्रंथाची निर्मिती झाली. 'गांधीजींची आत्यंतिक अहिंसा हा दुर्गुण आहे' यावर आधारित 'संन्यस्त खड्क या नाटकातून आणि गोमांतक या खंडकाव्यातून अहिंसेवर ताशेरे ओढले. याशिवाय संगीत उःशाप या नाटकातून अस्पृश्यतेचा प्रश्न हाताळला तर संगीत उत्तरक्रियामधून हिंदूपदपातशाही हा विषय हाताळला. कमला. महासागर, विरहोच्छास ही त्यांची खंडकाव्ये तर माझी जन्मठेप हा त्यांचा आत्मचरित्रात्मक ग्रंथ, याशिवाय सहा सोनेरी पाने, काळेपाणी, तेजस्वी तारे, लंडनची बातमीपत्रे, शत्रूच्या शिबिरात, माझ्या आठवणी अशी अनेक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत सावकरांचे साहित्याविषयी स्वतःचे असे काही विचार होते. साहित्य हे जीवनावरचे भाष्य असावे ते केवळ आनंदनिर्मितीसाठी नसावे. ही त्यांची वाङ्मयाविषयी भूमिका होती. मानवी जीवन कसे आहे एवढेच त्यांना वाङ्मयातून दाखवायचे नव्हते तर ते कसे असावे हेही सांगायचे होते. साहित्यिकाने सामाजिक बांधीलकी स्विकारलीच पाहिजे असे त्यांचे मत होते. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी या महान क्रांतिकारक साहित्यिकाचे निधन झाले. **१८९५:-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी भाई माधवराव खंडेराव बागल यांचा जन्म. 'अशी होती राजवट', 'कला आणि कलावंत भाग १,२', 'कोल्हापूरचे कलावंत', 'जबाबदार राज्यपध्दती', 'बुधं शरणम् गच्छामि', 'सुलभ समाजवाद भाग १,२', 'मार्क्सवाद लेनिन, स्टॅलिन' अशी ग्रंथ संपदा. **१८९६:-** नाटककार, कथालेखक नरहर गणेश कमतनूरकर यांचा जन्म. त्यांचे रेसच्या नादाचे दुष्परिणाम दर्शवणारे 'श्री' हे नाटक त्याकाळात (१९२६) गाजले. याशिवाय 'सज्जन', 'स्त्री-पुरुष', 'चिरंजीव शारदा' ही नाटके तसेच 'सरस्वती कुमारांच्या गोष्टी', 'रक्त आणि इतर गोष्टी' हे 'कथासंग्रह आणि मराठ्यांची मुलगी' ही ऐतिहासिक कादंबरी अशी साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१८९८:-** नगरसेवक ते महापौर असा प्रवास करणारे नेते गणपतराव महादेव नलावडे यांचा जन्म. 'संग्राम' नावाचे साप्ताहिक त्यांनी नानासाहेब गोखले यांच्या सहकार्याने चालवले. **१८९९:-** नाटककार, चरित्रकार मोरो विठ्ठल वाळवेकर यांचे निधन. निळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर युरोपियन कारखानदार कसे अत्याचार करतात याचे विदारक चित्रण 'नीलदर्पण नाटक' या आपल्या अनुवादीत पुस्तकातून त्यांनी केले आहे. जॉर्ज वॉशिंग्टनचे चरित्रही त्यांनी लिहिले आहे. **१९०३:-** उदयोगमहर्षी शंतनुराव किर्लोस्कर यांचा जन्म. त्यांनी दिलेली 'व्याख्याने', 'जेट युगातली मराठी माणुस', 'काळापुढती चार पावले'या पुस्तकात संग्रहीत. **१९४४:-** लेखिका, मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या, प्रा. मुमताज कासिम रहिमतपुरे यांचा जन्म. 'आकाशातल्या चांदण्या', 'चिमण उंदरे व गुंडोबा', 'बोभाटा' हे बालकथासंग्रह, 'किती दिवस' ही एकांकिका, 'देव पाखरु' हे पक्ष्यांवर, 'दैवत' ही बालकादंबरी, 'सायकी' हा ग्रीक कथासंग्रह, ङ्गमीनलफ ही परीकथा, अशी साहित्य संपदा. **१९५३:-** जागतिक दर्जाचे अर्थतज्ञ, लेखक, वक्ते डॉ. नरेंद्र जाधव यांचा जन्म. त्यांच्या 'आमचा बाप आणि आम्ही' या पुस्तकाचे इतिहास घडवला. भारतातील प्रमुख भाषांसह इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश, कोरीयन इत्यादी भाषांमध्ये त्यांचे अनुवाद झाले. आतापर्यत सव्वादोन लाख प्रतींची विक्री. **१९५५:-** दिवाळी अंक, मासिके, साप्ताहिके ह्यातून विविध विषयांवर विपूल प्रमाणात लेखन करणाऱ्या लेखिका अर्चना चारुदत्त ठोके यांचा जन्म. **१९६१:-** प्राच्यविद्यापंडीत प्रा.परशुराम कृष्ण गोंडे यांचे निधन. आतापर्यत ४७५ शोधनिबंध त्यांचे प्रसिध्द. **१९७५:-** समाजशास्त्र, अर्थशास्त्र, सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान या विषयांचे गाढे पंडीत भालचंद्र महाराज कहाळेकर याचे निधन. **१९८०:-** कवी शेख इरफान इकबाल यांचा जन्म. ह्यांच्या 'फुले वेचिता वेचिता', 'वेदनांच्या खोलीत कोवळे पाषाण', 'मुक्तछंद', 'आमच्या कविता' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **२०१०:-** महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे ज्येष्ठ समाजवादी विचारवंत साधनाचे संपादक, थोर स्वातंत्र्यसैनिक, नामांकित वक्ते, विद्यार्थिप्रिय प्राध्यापक, आदर्श लोकप्रतिनिधी, अभ्यासू लेखक अशा 'प्रधान मास्तरां'च्या अनेक प्रतिमा मराठी जनमानसावर ज्यांनी ठळकपणे उमटल्या, त्या ग. प्र. प्रधान यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# आशीर्वादाने होतेय जंगलतोड ?

## वन अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील कशेळे परिसरात मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याचे दिसून येत आहे. त्यातील कशेळे भागातून पाथरज रस्त्याने जात असताना किकवी गावाच्या हद्दीत असंख्य एकर जमिनीमधून जुनी झाडे तोडण्यात आली आहेत. अवैधरित्या तोड करणाऱ्या ठेकेदारांचा परवाना रद्द करावा आणि वन अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणी मनसेच्या कार्यकर्त्या भारती कांबळे यांनी केली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी रायगड जिल्ह्याचे उपवन अधिकारी यांच्याकडे केली आहे.

कशेळे खांडस रस्त्यावर अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स समोर किकवी गावातील शेतकऱ्यांची जमीन आहे. त्या जमिनीवर ३० ते ४० वर्षे जुनी झाडे असून ती सर्व झाडे तोडण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी वन विभागाकडे संपर्क साधला. जमिनीमधील जुनी झाडे तोडण्यासाठी वन विभागाच्या परवानगीचे पासेस संबंधित शेतकऱ्याने जंगलातील झाडांची तोड करणाऱ्या ठेकेदाराला दिली. मात्र, त्या ठेकेदाराने परवानगी असलेल्या जमिनीतील आणि परिसरातील झाडे तोडल्याचे दिसून येते. तेथे त्या ठेकेदाराने मोठ्या प्रमाणात झाडांची तोड करून मोठा



गैरव्यवहार केल्याची चर्चा आहे. हा सर्व प्रकार जानेवारी फेब्रुवारी महिन्यात सुरु होता. त्यावेळी आजूबाजूच्या शेतकऱ्यांना आपल्या जमिनीमधील झाडे तोडली असल्याबद्दल काहीच माहिती नसल्याचे समोर आले आहे.

कशेळे परिसरात मोठ्या प्रमाणात जंगलतोड करण्यात आल्याच्या बातम्या विविध वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर किकवी गावातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीतील झाडे आहेत किंवा नाहीत याची पाहणी केली. त्यावेळी आपल्या जमिनीत असलेली झाडे देखील कोणत्याही प्रकारची परवानगी न देता तोडण्यात आली असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्या शेतकऱ्यांनी वन विभागाकडे धाव घेतली. त्यावेळी वन विभागाने ओसवाल नामक शेतकऱ्यांच्या जमिनीवरील झाडे तोडण्याची परवानगी दिली असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात झाडे कशी तोडण्यात आली असा प्रश्न उपस्थित केला. मात्र, गेल्या तीन महिन्यात कोणत्याही अधिकाऱ्यांवर कारवाई वन विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाने केली नाही. तसेच वन विभागाकडून संबंधित ठेकेदारावर देखील कोणतीही कारवाई झाली नाही.

> आमच्या विभागाने साडे-पाच एकर जमिनीवरील झाडे तोडण्याची परवानगी शेतकऱ्यांना दिली होती. त्या व्यतिरिक्त अतिरिक्त जमिनीमधील झाडे तोडली असल्यास आम्ही खात्री करून कारवाई करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला सादर करू.
> –काळूराम लांगी.. वनपाल

भारती कांबळे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी किकवी येथील जमिनीमधील अतिरिक्त जंगलाची अवैद्यरित्या तोड केल्याबद्दल जिल्हा उपवन अधिकारी यांना पत्र देऊन संबंधित जंगल ठेकेदाराचा परवाना रद्द करण्याची मागणी केली आहे, तर वन अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# प्रचंड उष्म्याचा जनजीवनावर परिणाम

### अंगाचा दाह कमी करण्यासाठी पाण्याचा आधार

**। कोलाड । वार्ताहर ।**

निरभ्र आकाश व कोरड्या वातावरणामुळे सर्वत्र कमाल तापमानात वाढ झाल्याने प्रचंड उष्मा जाणवू लागला आहे. वातावरणात प्रचंड वाढलेल्या उष्म्याचा जनजिवनावर परिणाम होत आहे.

प्रचंड वाढलेल्या उष्म्यामुळे सकाळी आठ वाजल्यापासूनच उन्हाचे प्रचंड चटके बसत आहेत. तर सकाळी ११ च्या नंतर सहसा घरातून बाहेर पडताना कोणीही दिसत नसल्याने रस्ते ही निर्मनुष्य दिसत आहेत. तसेच प्राणी देखील तळी, डबकी तसेच अन्य पाण्याच्या जागा झाडांच्या सावलीचा आधार घेत आहेत, उष्म्यापासून सुटका करण्यासाठी नागरिकही नदीच्या अथवा समुद्राच्या पाण्यात भिजून अंगाची झालेली दाह कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सध्या तापमानाचा चढलेला पारा येत्या काही दिवसात आणखी वाढणार असल्याचा हवामान खात्याने अंदाज व्यक्त केल्यामुळे पुढील दिवसात याही पेक्षा कठीण अवस्था राहणार आहे. त्यामुळे पावसाळी हंगामातील शेतीच्या पुर्व मशागतीची कामे बऱ्याच अंशी खोळंबली असून मशागतीच्या कामावर परिणाम होऊ लागला आहे. जेमतेम सकाळी ११ वाजेपर्यंत आणि दुपारी ४ नंतर सात वाजेपर्यंत शेतकरी वर्ग शेतात काम करीत आहेत. तसेच प्रचंड उष्म्यामुळे मजूर शेतीच्या कामाला मिळत नाही, असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. बदलत्या हवामानामुळे जनजीवनावर परिणाम होऊ लागल्यामुळे येथील नागरिकांची चिंता वाढली आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ मे

१) श्री. बाळकृष्ण राजाराम गावडे
श्रीबाग, अलिबाग, २८-५-१९३४
२) श्री. दत्तात्रेय नारायण तेलंगे
विद्यानगर, अलिबाग, २८-५-१९४२
३) श्रीम. निशिगंधा शशिकांत कंटक
कुरूळ, अलिबाग, २८-५-१९४८
४) श्री. नंदकुमार मधुकर डोळस
विद्यानगर, अलिबाग, २८-५-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## तनिष्का नगरकर ९७.८० टक्के गुण मिळवून प्रथम

**महाड :** दहावीचा निकाल जाहीर झाला. केईएसची विद्यार्थिनी तनिष्का नगरकर हिने ९७.८० टक्के गुण मिळवून महाडमधून प्रथम येण्याचा मान मिळवला. यावर्षी दहावीचा निकाल वेळेआधीच लागला आहे. दुपारी १ वाजता संकेतस्थळावर निकाल जाहीर झाला. केईएसची विद्यार्थ्यांनी तनिष्का शेट्टे ९७.४० टक्के गुण मिळवून दुसरी आली. गुरुकुल स्कुलचा मयुर महेश नाझरे ९६.६० गुण मिळवून तिसरा आला तर केईएसची आर्या नाईक ९६.४० टक्के गुण मिळवून चौथी आली.

# पदवीधर, शिक्षक निवडणूक मतदार नोंदणीसाठी २८ मे अंतिम मुदत

**। नवीमुंबई । प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोगाने २४ मे २०२४ च्या प्रसिध्दी पत्रकानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मतदार नोंदणीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २८ मे २०२४ असून हे अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन स्विकारले जातील अशी माहिती उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या जाहीर केलेल्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नामनिर्देशपत्रे शुक्रवारी ३१ मे रोजी स्वीकारली जातील. ही नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी शुक्रवारी ७ जून, २०२४ ही अंतिम मुदत राहील. बुधवार २६ जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर आणि मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रमासाठी २४ मे २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी संबंधित मतदार यादीत नाव नोंदणीसाठी भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे २८ मे २०२४ पर्यंत ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारले जातील.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी जास्तीत जास्त पदवीधर नागरिकांनी विहित मुदतीत मतदार नोंदणी करावी, असे आवाहन यादव यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात पेरणीपूर्व मशागतींना वेग

## बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग

**। सुकेळी । वार्ताहर ।**

मागील आठवड्यात अनेक ठिकाणी झालेल्या हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसामुळे शेतकऱ्यांकडून पेरणीपूर्व मशागतींच्या कामांना वेग आला आहे. तर काही ठिकाणी खरीप पिकांच्या पेरणीसाठी आवश्यक असणारी शेतीची मशागत जवळपास शेतकऱ्यांनी कडक उन्हाची पर्वा न करता पूर्ण केली आहेत.

खरीप पेरणीसाठी शेतकरी राजा सज्ज झाला असुन त्याचे डोळे पाऊस केव्हा पडणार म्हणून



आभाळाकडे लागले आहेत. जणु काही शेतकरी पावसाची एका चातकाप्रमाणे वाट पाहत आहे.

रायगड जिल्ह्यातील शेतकरी भातशेती मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळेच जिल्ह्यातील रोहा, सुधागड, पेण, अलिबाग, माणगाव, महाड आदी तालुक्यात मान्सूनपूर्व मशागतींना वेग आला असून पावसाने वेळेवर हजेरी लावल्यास शेतकऱ्यांकडून खरीपाची जोरदार तयारी सुरू होणार आहे.

या मशागतीच्या कामामध्ये जमीन नांगरणे, ढेकळे फोडणे, शेतातील केरकचरा काढणे, जमीन सपाट करणे, पाण्यासाठी पाट काढणे अशाप्रकारची कामे केली जातात. त्यामुळे सर्वत्र पेरणीपूर्व मशागतींना वेग आला असून बी - बियाणे, खते, औषधे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लगबग सुरु असल्याचे दिसून येत आहे.



## पाणी पंपिंग स्टेशनची पाहणी

**। माथेरान । वार्ताहर ।**

शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी माथेरानवासीयांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन पंपिंग स्टेशन ठिकाणी जनरेटर सुविधा उपलब्ध करा अशी मागणी केली होती. त्या अनुषंगाने पंपिंग स्टेशनवर लोकप्रतिनिधींनी अधिकारी वर्गासोबत स्वतः जाऊन पाहणी केली. नियमित पाणी बिल अदा करूनदेखील येथे सुरळीत पाणी पुरवठा होत नाही. काही तासांसाठी विद्युत पुरवठा खंडित झाल्यास याचा परिणाम मात्र शहराच्या पाणी नियोजनावर होतो.याकरिता जिथे माथेरान पाणी पंपिंग ठिकाणे आहेत त्याठिकाणी पूर्वी प्रमाणे जनरेटर सुविधा सुरू करा, अशी मागणी येथे माथेरानवासीयांकडून करण्यात आली होती.

# पालीत दोन शाळांचा १०० टक्के निकाल

**। पाली । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर जाहीर झाला आहे. कोकण एज्युकेशनचा डॉ. प्रभाकर रामचंद्र गावंड विद्यालय परळी व अनुदानित प्राथमिक व माध्यामिक आदिवासी आश्रमशाळा पडसरे, प्रबोधनकार ठाकरे माध्यमिक विद्यालय माणगाव या शाळांचा १०० टक्के निकाल लागला आहे.

गावंड विद्यालय परळी शाळेत ३४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते पैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी पास झाले असून सुधागड तालुक्यातून या शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे. तर ८०.६० टक्के मिळवून साक्षी रामचंद्र मोरे प्रथम आली. ऋतुजा देशमुख ७७.६० टक्के गुण मिळवून दुसरी आली. तसेच सारिका डुमना ही ७० टक्के मिळवून तृतीय आली. शाळेचे चेअरमन अॅड. प्रवीण कुंभार, शाळेचे मुख्याध्यापक बिपीन पाटील, शाळेचे शिक्षक, अहिरे, शिक्षिका शिरसाळे, शिक्षक भालेराव, सुरवसे, बोरिटकर, आनंद मनवर, वैशाली भला व शिक्षकेतर कर्मचारी घुटे यांनी विद्यार्थ्यांच्या यशा बद्दल कौतुक केले.

### शाळांचा निकाल

**जागृती हायस्कूल नाडसुर चा निकाल ९५.६५ टक्के, संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगावचा निकाल ९१.६६ टक्के, बल्लाळ विनायक माध्यमिक प्रशाला पालीचा निकाल ८४.३७ टक्के, गणेश बाळकृष्ण वडेर हायस्कूल व वसंतराव ओसवाल कनिष्ठ विद्यालय ९२.५१ टक्के, अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा वावळोली शाळेचा निकाल ८३.०३ टक्के, आत्मोन्नती विद्यामंदिर जांभूळपाडाचा निकाल ९२.५३ टक्के, पूज्य ठक्करबाप्पा अनुदानित प्राथमिक व शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये माध्यामिक आदिवासी आश्रमशाळा चिवेचा निकाल ९६.८७ टक्के, शारदा विद्यामंदिर पेडलीचा निकाल ९६.४२ टक्के, माध्यमिक विद्यालय वाघोशीचा निकाल ९३.१० टक्के,माध्यमिक विद्यालय पाच्छापूर चा निकाल ९२.टक्के, स्वामी विवेकानंद विद्यालय मजरे जांभूळपाडाचा निकाल ८९.४७ टक्के लागला आहे.**



**आला पावसाळा... काही दिवसांनी पावसाला सुरूवात होणार आहे. बाजारांमध्ये विविध प्रकारच्या छत्र्या, रेनकोट विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)**

## दहावी परीक्षेत समृद्धी बोराडे तालुक्यात प्रथम

**। कर्जत । वार्ताहर ।**

शालांत परीक्षेत अभिनव ज्ञान मंदिर, कर्जत शाळेची समृद्धी संतोष बोराडे ही विद्यार्थिनी ९७ टक्के गुण मिळवून कर्जत तालुक्यात प्रथम आली आहे. तर शारदा मंदिर विद्यालयाचा ओम आनंदा जाधव हा विद्यार्थी ९५.८० टक्के गुण मिळवत तालुक्यात दुसरा, आला आहे. गीता घारे इंग्लिश मिडीयम स्कूल, खांडपे येथील साईराम खत्रावतने ९५.२० टक्के गुण मिळवून तिसरा आला आहे.

अभिनव ज्ञान मंदिर, कर्जत शाळेत प्रथम - समृद्धी बोराडे,द्वितीय सार्थक लोखंडे, तृतीय - शंतनु पाटील, शारदा मंदिर, कर्जत प्रथम - ओम जाधव , केतकी श्रीखंडे, तृतीय - सृष्टी पाटील, गीता इंग्लिश मिडीयम स्कूल, खांडपे प्रथम - साईराम खत्रावत, द्वितीय - नेत्रा शेळके, तृतीय - भक्ती चोराघे, गीता सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल, खांडपे प्रथम - हर्षदा जाधव , द्वितीय - सानिया देशमुख , तृतीय - भक्ती कदम, के. ई. एस. इंग्लिश मिडीयम स्कूल, कर्जत प्रथम - तनुश्री गुजराथी , द्वितीय - प्रिया थोरवे, तृतीय - गौरी बोराडे , नेरळ विद्या मंदिर, नेरळ प्रथम - राज कदम , द्वितीय - प्रथमेश म्हात्रे , तृतीय - जयदीप घारगे, श्री गजानन विद्यालय, कडाव प्रथम-कुणाल भुंडरे, द्वितीय - रोहिणी घारे, तृतीय - प्रज्ञा बोडके, ज्ञान मकरंद विद्यालय, खांडपे प्रथम - आयुष दीक्षित, द्वितीय - सिद्धी घारे, तृतीय क्रमांक सागर देशमुखने पटकावला.

# आपत्तीशी लढण्यासाठी प्रशासनाची तयारी सुरु

**। महाड । वार्ताहर ।**

तालुक्यात गेली काही वर्षापासून नैसर्गिक आपत्तीमुळे जीवित आणि वित्त हानी मोठ्या प्रमाणावर होत आहे. या नैसर्गिक आपत्तीला सामना करण्यासाठी प्रशासन गेली महिनाभरापासून तयारी करत आहे. महाड नगर पालिकेने नागरिकांना सतर्क ठेवण्यासाठी लागणारी यंत्रणा आणि बचाव साहित्याची चाचपणी सुरु केली आहे.

सन १९८० च्या आधीपासूनच महाड मध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्याच्या नोंदी आहेत. तर १९९२ मध्ये पारमाची गावात दरड कोसळून मोठी जीवितहानी झाली होती. त्यापाठोपाठ सन २००५ मध्ये दासगाव, जुई, कोंडीवते, रोहन तर २०२१ मध्ये तळीये गावात दरड कोसळून मोठी जीवितहानी आणि वित्तहानी झाली. सन २०१९ मध्ये देखील पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. सन २०१६ मध्ये देखील अतिवृष्टीत सावित्री पूल वाहून गेला होता.महाड सह पोलादपूरमध्ये याबाबत भूगर्भ शास्त्र विभागाकडून सर्व्हेक्षण करण्यात आले आहे.

महाड तालुक्यात नैसर्गिक आपत्ती उद्भवली तर नागरिकांना सुरक्षित रित्या बाहेर काढणे, त्यांना पूर परिस्थितीत मदत करण्यासाठी यंत्रणा पुरवणे, पूर परिस्थितीत उद्भवली तर नागरिकांना सतर्क करणे, अशा विविध यंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी प्रशासनाची जय्यत तयारी सुरु आहे.

गेली महिनाभर स्थानिक प्रशासन याबाबत बैठका घेत यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या कामात गुंतली आहे. महाड पोलादपूर तालुक्यात जवळपास शंभरहून अधिक गावे संभाव्य दरडग्रस्त छायेत आहेत. महाड तालुक्यात ४८ गावे दरडग्रस्त तर २४ गावे संवेदनशील यादीत आहेत. महाड उपविभागीय कार्यालयाकडून तात्पुरत्या निवारा शेड आणि याठिकाणी कोणते उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला सादर केला आहे. आपत्तीशी सामना करण्यासाठी या संभाव्य गावातील नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करणे आवश्यक आहे.

याकरिता तात्पुरत्या निवारा शेडची संकल्पना पुढे आणली आहे. या गावातून तात्पुरत्या निवारा शेड करिता महाड तालुक्यात २४.३९ कोटी तर पोलादपूर तालुक्यात १४.९० कोटी असा एकून ३९.२९ कोटीच्या निधीची तरतूद अपेक्षित आहे.

नगर पालिकेनेदेखील नागरिकांना पूरपरिस्थितीत सुरक्षित बाहेर काढण्यासाठी लागणारी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. यामध्ये दोन पॉली इथिलीन रेस्क्यू दोन बोटी, फुट पंप बोट, मेगा फोन, सर्च लाईट, कटर, रेन कोट, आदी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. नागरिकांना पूरपरिस्थितीमध्ये स्थलांतरित करण्यासाठी तात्पुरते निवारा शेड, आदीची व्यवस्था केली जात आहे. आपत्कालीन मदत केंद्र देखील पालिका प्रशासनाच्या इमारतीमध्ये सुरु केले जात असल्याचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी सांगितले.

# सायली ठरली पहिली रिक्षा चालक

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री असल्यामुळे पुरूष यशस्वी होतो, असे अनेकदा ऐकण्यात येते. परंतु एखाद्या स्त्रीला पतीने पाठिंबा दिल्यास स्त्री ही यशस्वी होते. याचे उत्तम उदाहरण श्रीवर्धन तालुक्यातील भोस्ते या खेडेगावात बघावयास मिळाले.

भोस्ते खेडेगावातील तेहतीस वर्षीय सायली सुरज वैराग यांचे शिक्षण दहावी पर्यंत झाले. मोलमजुरी व घरची शेती करीत आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावणे व वेळ मिळाला की दोन्ही मुलांचा अभ्यास घेणे ही दिनचर्या. सायली यांच्या पतीचा मुळचा व्यवसाय रिक्षाचा आहे. स्वतःच्या मालकीच्या



तीन रिक्षा व शेती यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली आहे. सुरज हे अनेक वर्षे रिक्षा व्यवसाय करतात. तीन पैकी दोन रिक्षा व्यवसायासाठी लावल्या आहेत, तर एक रिक्षा चालकाअभावी अनेक दिवस घराच्या अंगणात उभी केलेली होती.

अखेरीस सायली यांनी पती व सासू सासऱ्यांना विचारले की, आपली घरचीच रिक्षा आहे. मी रिक्षा चालवण्यास शिकू का. घरातून परवानगी मिळाल्यावर सुरज यांनी सायलीला रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यास सुरुवात केली. प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर लायसेन्स व बॅचही मिळवून दिला. आजच्या घडीला जसवली तळा फाट्यावर सायली आपली रिक्षा व्यवसायाकरीता उभी करीत असून श्रीवर्धन तालुक्यातील पहिली महिला रिक्षाचालक म्हणून भोस्ते खेडेगावातील सायली सुरज वैराग यांच्याकडे बघितले जात आहे.

# रामेश्वर येथे श्रमदानातून निसर्ग संवर्धन

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या चार शिव मंदिरांपैकी एक मंदिर म्हणजे 'रामेश्वर', यालाच 'वरचे रामेश्वर' सुद्धा म्हणतात. काळाच्या ओघात येथील पुरातन विहीर गाळाने भरलेली होती.

दीपमाळेची देखील पडझड झाली होती. जल, निसर्ग, वृक्ष व पुरातन वास्तु यांचे संवर्धन करण्याच्या हेतूने निसर्गमित्र, पनवेल या संस्थेने २४ ते २६ मे या कालावधीत श्रमदान करून येथे विविध संवर्धनाची कामे पार पाडली.

या मोहिमेत अंदाजे ६० कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. यात तरुण तरुणी, स्त्री पुरुष सर्वांनीच श्रम



दान केले. या मोहिमेचे लीडर्स होते सचिन शिंदे व प्रिसिलिया मदन. गड संवर्धनासाठी नेहमीच पुढाकार घेणारा राज इंदवटकर तसेच पीयुष तरटे हे देखील या मोहिमेचा भाग होते. प्रदीप लांगी व राजेश दापसे या स्थानिक कार्यकर्त्यांचे विशेष सहकार्य लाभले. श्रमदानासाठी लागणारे आवश्यक साहित्य ग्रामस्थांनी पुरवले.

बेसुमार उपसा व गाळाने भरलेले पाण्याचे स्त्रोत, यामुळे पाण्याचा प्रश्न जटिल बनला आहे. श्रमदान करून विहिरीसारखा पाण्याचा स्त्रोत पुनर्जीवित करण्याचा हा प्रयत्न इतरांना दिशादर्शक ठरेल हे मात्र नक्की. अशाच मोहिमेतून पुढील कार्यकर्ते घडतात व हेच कार्यकर्ते भविष्यात समाजाला दिशा देतात.

### श्रमदानातून केलेली कामे

**– वरचे रामेश्वर येथील ऐतिहासिक विहिरीचे पुनर्जीवन**
**– देवराईत वाहणाऱ्या ओढ्यांवर ३ बंधारे घातले**
**– गणेश कुंडातील पाणी उपसून गाळ काढला**
**– देवळाच्या परिसरात बहावा, वड, मोह, बेल अशी ८ झाडे लावली**
**– हजारो बिया (आंबा, फणस, चिंच, करवंद, आदी.) परिसरात व देवळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा लावल्या.**
**– दगडी उंच दीपमाळेचा पार रुंद करून त्याचा पाया अधिक मजबूत केला.**

**निवडक**

## शेट्ये यांचा प्रामाणिकपणा

**श्रीवर्धन :** श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे हजारो भाविक, पर्यटक वर्षभर येत असतात. येथील राजेश शेट्ये यांच्या गोकुळ होम स्टेमध्ये अलिबाग येथील पर्यटक दयानंद देसाई यांची सुमारे साडेतीन ते चार लाख रुपये किंमतीची सोन्याची वस्तु राहिली होती. तेथे काम करणाऱ्या धर्मेंद्र याला खोली साफ करताना ती वस्तु सापडली. राजेश शेट्ये यांनी तात्कळ संबंधित पर्यटकांशी संपर्क साधून ही गोष्ट सांगितली. त्यानुसार दि.२५ मे रोजी सोन्याची वस्तु प्रामाणिकपणे मूळ मालकास परत करण्यात आली.

## अपूर्वा जंगम यांचा सेवासन्मान

**माणगाव :** महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे माणगावच्या हरहुन्नरी आदर्श शिक्षिका अपूर्वा अमोल जंगम यांना सेवासन्मान राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी सिनेअभिनेत्री किशोरी शहाणे, अनंत राऊत, दीपक चामे, मेघाराणी जोशी, मधुरा पालांडे यांच्या हस्ते अपूर्वा जंगम यांना उपरोक्त महाराष्ट्र शिक्षक पॅनलकडून सेवासन्मान राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## आमडोशी येथे दासबोध सप्ताह

**सुकेळी :** आमडोशी येथे श्री. समर्थ सद्गुरु ताईसाहेब महाराज यांची २८ वी पुण्यतिथी व अखंड दासबोध सप्ताहाचा कार्यक्रम गुरुवर्य श्री. गुरुदास अनंत महाराज यांच्या हस्ते दि.२७ ते २९ मे रोजी पार पडणार आहे. या कार्यक्रमाची सोमवारी माऊलींची पाद्यपूजा, भजन, अखंड दासबोध नामसप्ताहाने सुरुवात होणार आहे. तसेच, या तीन दिवसांमध्ये गुरुदास अनंत महाराज.राजाभाऊ पांचाळ, गुरुभगिनी उषाताई कुलकर्णी, चव्हाण महाराज, हनुमंत निंबाळकर, लोकम गुरुजी यांचे प्रवचन होतील.

## पारनाक्यावर वाहतुक कोंडी

**रेवदंडा :** मुरूड तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आल्याने पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, या गर्दीचा भार अलिबाग ते मुरूड रस्त्याला सहन करावा लागतो आहे. मुरूडकडे जात असलेली पर्यटकांची बहुतांश लहान-मोठी वाहने जा-ये करण्यासाठी रेवदंडा बाजारपेठेतील मुख्य रस्त्याचा वापर करतात. रेवदंडा बाजारपेठेतील रस्ता अगोदरच अरूंद असल्याने तेथून दोन वाहने पास करताना वाहन चालकांची तारांबळ उडते. परिणामी रेवदंडा येथील पारनाक्यावर वाहतुक कोंडीस सामोरे जावे लागते.

## नरेंद्र गुरव यांचा सन्मान

**अलिबाग :** तालुक्यातील नवगाव शाळेत कार्यरत असलेले नरेंद्र गुरव या शिक्षकाच्या कामाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली. दरम्यान, गोवा गव्हर्नमेंट पीडब्ल्यूडी स्टाफ क्रेडिट सोसायटी लिमिटेड, इंटिग्रेटेड सोशल वेल्फेअर सोसायटी व नॅशनल रसल डेव्हलपमेंट फाउंडेशन बेळगाव यांच्यावतीने २०२३-२४ या वर्षाकरिता दिला जाणारा 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार' नरेंद्र गुरव यांना एका शानदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात आला .

# नौकांची मासेमारी बंद

## वादळी वातावरणाचा फटका

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

**महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पावसाळ्यात १ जून ते ३१ जुलैपर्यंत समुद्रातील मासेमारी बंद राहणार आहे. मात्र, समुद्रात २४ मे पासूनच अकस्मातपणे वादळी वातावरण निर्माण झाल्याने मुरूड परिसरातील एकदरा, राजपुरी, दिघी येथील सुरू असलेली मच्छीमारी वेळे आधीच बंद करण्यात आली आहे. तसेच, सुमारे १०० नौका किनाऱ्यावर नांगरण्यात आल्याची माहिती एकदरा गावच्या कोळी बांधवांनी सांगीतले.**



यावेळी स्थानीक कोळी बांधवांनी प्रतिक्रिया देत म्हणाले की, १ जून पूर्वी छोटी-मोठी मासेमारी करण्याचा आमचा प्रयत्न होता. शेवटच्या मासेमारी सत्रात पद्मजलदुर्ग समुद्र परिसरात कोलंबीची मासेमारी सुरू होती. परंतु, २४ मेपासून वादळी वातावरणामुळे ही मासेमारी देखील बंद करावी लागली आहे. बंगालमध्ये सुरू असलेल्या रेमल चक्रीवादळाचा देखील आधिक परिणाम अरबी समुद्रात होत असल्याचे येथील नाखवा मंडळींनी स्पष्ट केले. १२ वाव पेक्षा आधिक खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मोठ्या दालदी नौकांना देखील याचा फटका बसल्याचे सांगण्यात आले. यामुळे एकदरा, मुरूड खाडीत नौका नांगरण्यात आल्या असून दिघी, राजपुरी येथील मच्छीमारी देखील ठप्प असल्याचे सांगण्यात आले. यामुळे मुरूड मार्केटमध्ये मासळीचा ठणठणाट पाहायला मिळाला.

पावसाळ्यासाठी पर्यटक आणि मुरुडकरांनी बोंबील, अंबाडी, वाकट्या, जवळा आदी सुकी मासळी खरेदीसाठी मोर्चा वळविल्याचे दिसत होते. अखेरच्या मोसमात काहीशी कोलंबी मिळू लागली होती. वादळाचे संकट आल्याने मच्छीमारी साठीची उरली सुरली आशा आठ दिवस आधीच संपुष्टात आल्याची भावना मच्छीमारांनी व्यक्त केली आहे.

# उन्हाच्या तीव्रतेने केळीच्या बागा सुकल्या



**। खांब । वार्ताहर ।**

उन्हाच्या झळा दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र होत चालल्या असून या तीव्र झळांनी केळीच्या बागा सुकू लागल्या आहेत.

गेल्या अनेक वर्षांच्या मानाने या वर्षाचा उन्हाळा हा अधिकच तीव्र स्वरूपाचा असल्याने मानवासह मानवेतर सजीव सृष्टीवरही यांचा चांगलाच दुष्परिणाम जाणवू लागला आहे. अतिशय नाजूक खोड असलेली व जास्त पाण्याची गरज असलेली केळीची झाडे सुकू लागली आहेत. केळीची झाडे सुकू लागल्याने केळी बागायतदार यांना याचा चांगलाच फटका बसला असल्याचे दिसून येत आहे. केळी हे फळ बारमही पिकणारे व बारमही खाल्ले जात असल्याने केळींना सर्वच ऋतूंमध्ये मोठी मागणी असते.

# खड्डेमय रस्त्याची डोकेदुखी दूर होणार

## दीड महिन्यात ५०० मीटर काम पूर्ण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील महत्वाच्या रस्त्यांपैकी एक असलेल्या नेरळ-कशेळे रस्त्यावरील खड्ड्यांची कटकट आता संपणार आहे. नेरळ साई मंदिर नाकापासून पुढे जिते वाडीपर्यंत हा रस्ता पावसाळयात पाण्याखाली जातो. उन्हाळ्यात अर्ध्या रस्त्यावर आजूबाजूच्या इमारतीमधील पाणी वाहून येऊन रस्ता खराब होतो.दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या कामासाठी मोठी निधी दिला असून या रस्त्याचा तब्बल १५०० मीटरचा भाग काँक्रीटचा बनविला जात आहे.

कोल्हार फाटा पासून जिते फाटा आणि पुढे सुप्रिया हॉटेल हा ५०० मिटर लांबीचा रस्ता अंतिम टप्प्यात असून या रस्त्याचा ५०० मीटर लांबीचा एक भाग सार्वजनिक बांधकाम खात्याने अवघ्या दीड महिन्यात पूर्ण केला आहे. पावसाळा सुरू होण्याआधी त्या रस्त्यावरील १५०-२०० मीटर लांबीचा एक भाग देखील पूर्ण करून अखंड रस्ता बांधकाम खात्याकडून खुला होणार आहे.



या रस्त्यावर दरवर्षी उल्हास नदीचे पाणी नदीला पूर आल्यानंतर रस्त्यावरून वाहत जाते. त्यामुळे डांबरी रस्ता टिकत नाही. ही बाब लक्षात घेऊन या रस्त्यावर पाटील वडापाव पासून जिते वाडी पूजा रिसोर्ट पुल या भागातील ५०० मिटर रस्ता देखील काँक्रिटचा बनविला जात आहे.

या ठिकाणी रस्त्याची एक बाजू एक महिन्यात पूर्ण करण्यात सार्वजनिक बांधकाम खात्याला यश आले आहे. त्यामुळे कशेळ रस्त्यावरील दरवर्षी खड्डेमय होणारा रस्ता यावर्षीपासून काँक्रिट रस्त्यामुळे सुखकर होणार आहे. यामुळे नेरळ - कशेळ रस्त्यावरील पावसाळ्यात खराब होणारे नेरळ साई मंदिर ते जिते फाटा आणि वाकस गाव या सर्व भागातील रस्ते काँक्रिटचे बनल्याने रस्ते खड्ड्यात जाण्याची वेळ येणार नाही, अशी भावना वाहनचालक व्यक्त करीत आहेत.

## मिनरल वॉटरची मागणी वाढली

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

रणरणत्या उन्हामध्ये अंगाची लाही होत असताना, नागरिक स्वतःच्या आरोग्याची खबरदारी घेताना दिसू लागले आहेत. यामुळे आपली तृष्णा शांत करण्यासाठी मिनरल वॉटर घेण्याकडे आनेकांचा कल निर्माण होत आहे. पुर्वी वाटसरुंची तहान भागविण्यासाठी पाणपोई उपलब्ध असायची, मात्र आता आरोग्याचा विचार करुन प्रत्येक जण मिनरल वॉटरचा वापर करीत असल्याचे दृश्य अनेक ठीकाणी पहायला मिळत आहे. पानटपरी, हॉटेल, किराणा दुकान, लहान व्यावसायीक यांच्याकडे मिनरल वॉटर सहजपणे उपलब्ध होत असल्याने नागरिकांची तहान भागविण्याला त्यातून मदत होत आहे.

# आठवडा बाजाराला उन्हाचा तडाखा

**। सोगाव । वार्ताहर ।**

राज्यातील वाढत्या उन्हाचा फटका सर्वांनाच बसला आहे. तापमानात ४२ अंशापेक्षा जास्त वाढ झाली आहे. परिणामी अलिबाग तालुक्यातील वायशेत येथील दर रविवारच्या आठवडा बाजारात असणारी गर्दी रविवारी (दि.२६) कडक उन्हामुळे व भाज्यांचे दर कडाडल्याने ग्राहकांनी पाठ फिरवल्याचे चित्र होते. यामुळे बाजारात शुकशुकाट पसरला होता. यावेळी ग्राहकांविना व्यापारी व किरकोळ भाजी विक्रेते हवालदिल झाले असल्याचे दिसून आले.

राज्यभरात आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे झालेल्या नुकसानीमुळे भाज्यांचे दर कडाडल्यामुळे बहुतांश भाज्या



४० ते ५० रुपये पाव किलो दराने विक्री सुरू होती. तर, कोथिंबीरची जुडी तब्बल ५० रुपये दराने विकली जात होती. यामुळे ग्राहक काही अंशी नाराज झाले होते. अशातच आगोटीची लगबग सुरु झाल्यामुळे महिला व पुरुष ग्राहकांनी कांदे, बटाटे, लसूण, सुखी मच्छी, कडधान्ये, कपडे, छत्र्या, चपला आदी पावसाळ्यातील गरजेच्या व साठवणूक करणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करताना दिसून आले.

> आज भाज्यांची मोठ्या प्रमाणात दरवाढ झाल्याने आमचे जगणे कठीण झाले आहे. यापूर्वी २० ते ३० रुपये पाव किलो असलेल्या भाज्या आज ४० ते ५० रुपये पाव किलो झाली आहे. तसेच, कोथिंबीरीची ५० रुपये असलेली जुडी आज कशी विकत घ्यायची? आम्हाला परवडत नाही. कमवणार काय आणि विकत काय घेणार, असा प्रश्न पडला आहे. या झालेल्या भाज्यांचे दर आम्हाला परवडण्यासारखे नाही.
> - स्वप्नाली म्हात्रे, गृहिणी

संध्याकाळी ऊन कमी झाल्यानंतर ग्राहकांनी उशिरा बाजारात खरेदीसाठी धाव घेतली. यामुळे व्यापारी वर्गाला काही अंशी दिलासा मिळाला.

# उरणमधील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई



**। उरण । वार्ताहर ।**

उरणमधील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने केली होती. त्या मागणीला यश आले असून अनेक ठिकाणचे होर्डिंग्ज उतरविण्यात आले आहेत. तालुक्यात सिडको द्रोणगिरी व उरण-पनवेल महामार्गावर रस्त्याच्याकडेला शासकीय जागेवर अनधिकृत होर्डिंग्जचे साम्राज्य उभे राहिले आहे. शासकीय यंत्रणेचे अर्थपूर्ण हीतसबंध असल्याने जाहिरातीची एजन्सी चालविण्याऱ्यांवर कारवाई होत नाही. घाटकोपर येथे झालेल्या दुर्घटनेत १४ जणांचा बळी गेला. उरण तालुक्यातही अशाप्रकारे अनेक ठिकाणी अनधिकृत होर्डिंग्ज लाणण्यात आलेल्या अनधिकृत होर्डिंग्जवर त्वरित करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने केली होती. या मागणीला यश आले.

# फोफेरी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**। वाघ्रण । वार्ताहर ।**

माध्यमिक विद्या मंदीर फोफेरी हायस्कूलच्या सन १९८३-८४ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवारी (दि.२६) भुवनेश्वर येथे संपन्न झाला. यावेळी निवृत्त मुख्याध्यापक अनंत मोकल आणि निवृत्त शिक्षकांनी गणेश मुर्ती व सरस्वती मुर्तीचे पूजन केले. तसेच, सर्व शिक्षकांचे गुलाब पुष्प देत स्वागत केले. तसेच, माजी विद्यार्थी मच्छींद्र पाटील, सविता पाटील, जयवत वाणी व संजिवनी यांनी ईशस्तवन स्वागत गित सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उदय




पाटील यांनी करताना हा स्नेह मेळावा होण्यासाठी गेले दोन वर्ष घेतलेली मेहनत केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करताना ४० वर्षा पूर्वीच्या आठवणींना उजाळा दिला.

# गोसावी परिवाराच्यावतीने धार्मिक कार्यक्रम

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील धानकान्हे येथील नाथपंथी गोसावी समाजाच्यावतीने रविवारी (दि.२६) विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत संपन्न करण्यात आलेल्या या विविध प्रकारच्या कार्यक्रमांतर्गत कुलस्वामिनी उत्सव अंतर्गत महापूजा, ग्रंथराज



ज्ञानेश्वरीचे पारायण, सामुदायिक हरिपाठ, महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांसाठी धानकान्हे ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ व परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थिती नोंदवून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा लाभ घेतला. तर, या कार्यक्रमासाठी नाथपंथीय गोसावी समाजातील बाहेरगावी असणाऱ्या परिवारातील सदस्यांनी आवर्जून उपस्थिती नोंदवून विविध कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

# सुविधा पुरवण्यास पालिका अपयशी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटनस्थळी पर्यटक हे मौजमजा करण्यासाठी येत असतात. हे पर्यटनस्थळ शासनाच्या जमिनीवर वसलेले असल्याने येणाऱ्या पर्यटकांकडून माथेरान नगरपरिषद स्वच्छता कर वसूल करते. मात्र, त्या बदल्यात पर्यटकांना सोयीसुविधा पुरविण्यात माथेरान नगरपरिषद कमी पडत आहे. याकडे पालिका दुर्लक्ष करीत असल्याबद्दल माथेरान नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

माथेरान हे मुंबईपासून सर्वात जवळचे आणि शासनाची मालकी असलेले एकमेव पर्यटनस्थळ आहे. त्यामुळे पर्यटक या ठिकाणी येण्यासाठी पसंती देत असतात. पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून असलेल्या माथेरान शहरात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांकडून



पालिका स्वच्छता कर आकारत असते. त्याबदल्यात पर्यटकांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी देखील पालिकेची आहे. मात्र, मोडके तोडके सार्वजनिक सौचालय, पॉईंटवर पाण्याची सुविधा नाही, पर्यटकांना माहिती देणारे गाईड नाही, अशी अवस्था माथेरान येथे आहे. त्यामुळे स्वच्छता प्रवेश कर घेणाऱ्या माथेरान नगरपरिषदेला त्याचे कोणतेही सोयरसुतक नाही.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग
- अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१
- अलिबाग फार्म मध्ये येऊन फार्म हाऊससाठी दिवसभर स्त्री अथवा पुरूष कामगार पाहिजे. संपर्क : ९४२३८९०२९५
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०
- जय गजानन सोसायटी चेंढरे-अलिबाग 1BHK फ्लॅट नं. २०२ भाड्याने देणे आहे. मो.नं. ८०८००५८३७५
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५


जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मोबाईल कंपन्यांची सेवा वाऱ्यावर

## ग्राहकांमध्ये प्रचंड संताप

**। कापोली । वार्ताहर ।**

**श्रीवर्धन तालूक्यातील बोर्लीपंचतन, कापोली, दिवेआगर, शिस्ते, वडवली, वेळास, भरडखोल या गावांमध्ये मोबाईल नेटवर्क देणाऱ्या एअरटेल, व्हीआय, जीओ या सेवेचा मागील काही महिन्यांपासून फज्जा उडाला असून ऑनलाई कोणतीच कामे वेळेवर होत नाहीत. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून नागरिक पार वैतागले आहेत. या सेवेकडे कोणतेही अधिकारी चांगल्या व अखंडित सेवेसाठी तत्पर दिसत नसल्याने दूरध्वनी व मोबाईल नेटवर्किंग सेवेबाबत परीसरात प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.**



कायम गजबजणारी श्रीवर्धन तालुक्याच्या मध्यवर्ती असणारी बोर्लीपंचतन ही परिसरातील मोठी बाजारपेठ आहे. तालुक्यातील बोर्लीपंचतन सोबतच परिसरातील पर्यटन स्थळ असलेले दिवेआगर तसेच वेळास, कापोली, शिस्ते, कोंढेपंचतन, वांजळे, भरडखोल, वडवली व इतर छोटी मोठी गावे आहेत. इंटरनेटच्या युगात या गावांतील सर्व कार्यालये, महाविद्यालये ऑनलाईन पद्धतीने जोडली गेली आहेत. परंतु, सध्या एअरटेल, व्हीआय, जीओ मोबाईल कंपनीच्या सेवेला घरघर लागली असून नेटवर्क असुनही नसण्याचे प्रकार वाढले आहेत. याकडे संबधित कंपन्यांमधील अधिकारी सोयिस्कररित्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे भागातील नागरिकांचे म्हणणे आहे. एअरटेल, व्हीआय, जीओ अशा स्वरूपातील असलेली मोबाइल नेटवर्क किंवा इंटरनेट सेवा गत वर्षापासून साफ कोलडमली असल्याचे दिसत असून सामान्य जनतेला याचा प्रचंड त्रास होत आहे.

> मोबाईल रिचार्ज करून वाया जातो. कारण ना धड बोलता येते ना नेट वापरु शकत. एखादी गोष्ट डाऊनलोड करायची असेल तर तासंतास वाट पहात बसावे लागते. आता तर काय बोलता बोलता फोन कट होतात. याकडे संबंधित कंपन्यांनी लक्ष द्यावे, नाहीतर नेटवर्क पुर्णपणे बंद करून टाकावेत.
> – प्रमोद भायदे, ग्राहक, कापोली

> एअरटेल, व्हीआय, जीओ नेटवर्क सेवा पुर्ण कोलमडली आहे. परीसरात नेटवर्कचा खूप बोजवारा आहे. या नेटवर्क वाल्यांना एवढं कळत नाही की, आजकाल सर्व ठिकाणी नेटची गरज आहे. मग ते शैक्षणिक असो किंवा व्यावसायिक असो नेटमुळे डिस्ट्रिब्युटर लोकांनाही मालाची विक्री किंवा खरेदी करता येत नाही.
> – धवल तवसाळकर, वेळास

# पनवेलमधील दरडग्रस्त गावांची यादी जाहीर



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्याचा आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्यात आला असून १४ गावे दरडीच्या दहशतीखाली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यात चिंचवाडी, धोदानी, सतीची वाडी, मालडुंगे या आदिवासी वाडीचा देखील समावेश आहे. अतिवृष्टीमुळे भूस्खलनामुळे आपत्कालीन परिस्थिति निर्माण होऊ शकते. यामुळे या गावांना सतर्कतेचा इशारा तहसीलदार विजय पाटील यांनी दिला आहे. आपत्कालीन पथक देखील स्थापन करण्यात आले आहे. पावसात अनेकदा या वाड्यांचा संपर्क तुटतो. त्याचबरोबर दरड कोसळण्याची भीती निर्माण होते. धोदानी येथील आदिवासी वाडीचा संपर्क दरवर्षी तुटत असतो. आपत्ती व्यवस्थापन विभागाने तालुक्यातील गावांना दरडीचा धोका असल्याची शक्यता वर्तवली आहे. यात ओवळे, कर्नाळा, तळोजा व पनवेल ग्रामीणमध्ये डोंगराच्या पायथ्याची गावे व आदिवासी वाड्यांचा समावेश आहे. काही गावांना देखील धोका असून यामध्ये माडवभुवन, डोलघर, आकुर्ली, केवाळे, नानोशी, जांभिवली, माचीप्रबळ, कुंडेवहाळ, तुळशीमाळ, चावणे आदी गावांचा समावेश आहे.

**सतर्कतेचाही दिला इशारा**

> तालुक्यातील दरडग्रस्त गावे व आदिवासी वाड्यांची यादी जाहीर केली आहे.त्याठिकाणच्या नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे.आमचे आपत्कालीन पथक देखील सर्व घटनांवर बारकाईने लक्ष ठेवणार आहे.
>
> विजय पाटील
> तहसीलदार पनवेल

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# प्रवासादरम्यान सोन्याच्या चेनची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

एसटीमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशाच्या गळ्यातील सोन्याची चेन लबाडीच्या इराद्याने चोरल्याची घटना पनवेल एसटी आगारामध्ये घडली आहे. विशाल पाटील (३६) हे पेणमध्ये जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवून त्यांच्या गळ्यातील जवळपास ७० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन लबाडीच्या इराद्याने चोरी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**पदाजी पांडुरंग मुंबईकर स्कुल इंग्रजी माध्यम शाळा,**
**मुक्काम.वेश्वी, पोस्ट.दिघोडे, ता.उरण, जि. रायगड**
**वंचित व दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी** R.T.E. 25%
**आरक्षणांतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू**
**शैक्षणिक वर्ष सन-२०२४ २०२५**
**इयत्ता- १ली साठी**

कालावधी- १७ मे २०२४ पासून ३१ मे २०२४ पर्यंत

आवश्यक कागदपत्र वंचितसाठी :- १) जन्माचा दाखला २) आधारकार्ड ३) जातीचा दाखला ४) घरपट्टी ५) पासपोर्ट साईज फोटो

आवश्यक कागदपत्र दुर्बलसाठी (open) :- १) जन्माचा दाखला २) आधारकार्ड ३) सन २०२१-२२ किंवा २०२२-२३ चे एक लाखापेक्षा कमी असलेला उत्पन्नाचा दाखला ४) घरपट्टी ५) पासपोर्ट साईज फोटो

सूचना :- पालकांनी खालील साईटवर ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे. http/rte 25% admission.maharashtra.gov.in अधिक माहितीसाठी इंग्रजी माध्यम शाळा कार्यालयात संपर्क साधा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पी. पी. एम.ई.स्कूल वेश्वी**
**तालुका. उरण, जिल्हा. रायगड.**

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.:०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com
कार्यालय जा. क्र. पमपा/कर/२८२४/प्र.क्र.८३/१३८०/२०२४ दिनांक : २७/०५/२०२४

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहिर सूचना करण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्तगत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये मालमत्ता कराची सुधारित देयके ऑनलाईन पध्दतीने दिनांक २६ मे २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली असून ती प्रत्यक्ष बजावणेत येत आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालय, स्पेशल लिव्ह पिटीशन क्रमांक : १०८४९/२०२३ मधील सिव्हील अपील क्रमांक ००६०६५/२०२४ मधील, दिनांक २९/०४/२०२४ रोजीच्या अंतरिम निर्णयाच्या अनुषंगाने, तसेच याबाबत दाखल झालेल्या मिसेलिनियस अप्लीकेशन क्रमांक ९५२/२०२४ बाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८ मे २०२४ रोजी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार मालमत्ता कराच्या देयकाचे भाग- अ, ब व क प्रमाणे वर्गीकरण करणेत आलेले आहे. १) दिनांक ०१/१०/२०१६ ते सन २०२०-२१ या कालावधीची रक्कम भाग - अ ( Part - A ) मध्ये दर्शविण्यात आली असून भाग - अ ( Part - A ) मधील थकीत रक्कम मिळकतधारकाने भरणा केल्यास, ती, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त अंतरिम निर्णयास अधीन असेल. २) देयकातील भाग- अ ( Part - A ) मधील शास्तीची रक्कम, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या, याबाबतीत, भविष्यातील निर्णयानुसार परिगणना करून वसूलपात्र असेल. ३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त अंतरिम निर्णयानुसार देयकामधील सन २०२१-२२ ते सन २०२३-२४ या कालावधीची भाग ब (Part - B ) मध्ये दर्शविण्यात आलेली रक्कम दिनांक २९ जून २०२४ अखेरपर्यंत भरणा करणे अनिवार्य आहे. ४) सन २०२४-२५ या चालू वर्षाची देयकातील रक्कम भाग- क ( Part -C ) मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. **मा सर्वोच्च न्यायालय, स्पेशल लीव्ह पिटीशन क्रमांक १०८४९/२०२३ मधील सिव्हिल अपील क्रमांक ६०६५/२०२४ मधील, दिनांक २९/०४/२०२४ रोजीचा अंतरिम निर्णय** https://www.panvelcorporation. com **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

तथापि, महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा PMC TAX - APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास ऑनलाईन प्रसिध्दी दिनांकापासून देयके बजावण्यात आलेली आहेत असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तसेच भाग - क मधील सन २०२४-२५ या चालू वर्षाचा मालमत्ता कराचा एकरक्कमी भरणा दिनांक ३० जून २०२४ अखेर केल्यास चालू मागणीवर ५% सुट लागू असेल. त्याचप्रमाणे मालमत्ता कराचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट लागू असेल.

ज्या मालमत्ता धारकांना महानगरपालिकेमार्फत सुधारित देयके अद्याप प्राप्त झालेली नसल्यास त्यांनी आपली देयके ऑनलाईन किंवा ऑफलाईन व्दारे प्राप्त करुन घेऊन मालमत्ता कराचा भरणा लवकरात लवकर करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

सही/-
**(प्रशांत रसाळ)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that I am investigating the title of Vinod Kishan Nenwani (hereinafter referred to as the said "Owner") with respect to all that piece and parcel of agricultural land bearing Survey Nos. 69/16, 72/1B, 72/3A, 72/6A, 72/6B, 72/6C, 72/10B, 72/11, 72/16/B/2, 72/17B, and situate at revenue Vadvali Tarfe Varedi, Taluka Karjat and District Raigad and more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "Property"). The Owner has informed me that he owns and holds the said Property free from all encumbrances, claims and demands of any nature.

All persons/ entities including an individual, Hindu Undivided Family, a company, banks, financial institutions, non-banking financial institutions, a firm, an association of persons or a body of individuals whether incorporated or not, lenders and/ or creditors having any benefits, titles, claims, objections, demands or rights or interest in respect of the said Property or any part thereof including in any built-up areas constructed and/or to be constructed by way of sale, transfer, share, pledge, exchange, mortgage, gift, lien, trust, lease, sub-lease, tenancy, sub- tenancy, assignment, charge, bequest, succession, possession, inheritance, easement, license, occupation, possession, encumbrance, family arrangement/ settlement, bequest, succession, maintenance, trust, decree and/or order of any Court of Law, contracts/agreements, partnership, any arrangement, memorandum of understandings, letter of intent/heads of terms, development rights, right of way, Lis-pendens, reservation, power of attorney, option, FSI consumption, TDR, right of first refusal, pre-emption or any liability or any commitment or otherwise howsoever or of whatsoever nature are hereby required to intimate the same in writing along with documentary evidence to the undersigned at their address at Flat No.101, Pal Tower, Bhisegaon, Tal Karjat, Dist Raigad 410201, within 14 (fourteen) days from the date of publication of this notice of such claim, if any, failing which, any such right, title, interest, benefit, claim, demand and/or objection, if any, of any such persons/entities against the said Owner and/or in respect of the said Property and/or any part/s thereof shall be treated as waived or abandoned.

**SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**
**[Description of the Property]**

All that piece and parcel of agricultural land parcel lying, being and situate at revenue village Vadvali Tarfe Varedi, Taluka Karjat, and District Raigad in the State Maharashtra within the jurisdiction of the Sub-Registrar of Assurances at Karjat having the following descriptions:

| Survey No./ Hissa No. | Area in (H.R.P.) | Assessment (Rs. Ps.) |
|---|---|---|
| 69/16 part | 00-24-00 | 0.13 |
| 72/1B part | 00-44-00 | 0.25 |
| 72/3A | 00-16-00 | 0.14 |
| 72/6Apart | 00-08-27 | 0.10 |
| 72/6B | 00-08-33 | 0.02 |
| 72/6C | 00-40-47 | 0.32 |
| 72/10B | 00-22-00 | 0.10 |
| 72/11 | 00-32-00 | 0.25 |
| 72/16/B/2 | 00-31-00 | 0.15 |
| 72/17B | 00-44-00 | 0.27 |

Date 28May 2024

Sd/-
**Yadnyesh Bhagwat, Advocate**
**Mob No. 9307885711.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे भालगांव, ता. रोहा, जि. रायगड येथील...**

| मालकाचे नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री. गुरुनाथ शंकरराव गुणगेकर | १३१/१ | जिरायत ०-२५-३०<br>पो.ख.०-००-०<br>एकुण ०-२५-३० | ४.६९ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१८) अठरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. २८/०५/२०२४

सही
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ,
ता. रोहा, जि. रायगड
पिन नं.४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

दिनांक २८/०५/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आहे की, मौजे खंडाळे, ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेत जमिन मिळकत आमचे अशिल श्री. इंद्रजित बाजीराव गिते, रा. ४०१, टुलीप अपार्टमेंट, मोतीराम गार्डन, खेर सेक्शन, अंबरनाथ ईस्ट, ठाणे ४२१५०१ यांनी त्यांचे खालील नमुद विद्यमान मालक श्री.प्रविण दत्तात्रेय पाटील यांच्या मालकीची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे माझे अशिलांचे सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांच्याबरोबर साठेकरार/खरेदीखत करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| खंडाळे, ता. अलिबाग | ९९ | ०-०५-८० | १.७५ |

अशी संपुर्ण शेतजमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही विक्री, साठेकरार, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, फरोक्त, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, भाडेपट्टा, कुळअखत्यारपत्र, कोर्ट मॅटर, मृत्युपत्र अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचा मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत/तक्रार आमचे अशिल यांच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. शुभम साईनाथ वेळे**
मु. पो. खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो नं. ९६५७७८०१०४/८००७३८०१०४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती सुषमा सिताराम घरत यांचेकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकानी माझे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे सासवणे, ता. अलिबाग येथील :-

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ६८ | ०-२७-६० | ७.३० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- २८/०५/२०२४

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपुर्णा', मु.पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. रफीक अशफक मिस्त्री २. शबरा नौशीन रफीक मुल्ला रा. दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील जमिन मिळकती जमिन मालक १. श्री. शांतीलाल खीमजीभाई पटेल २. श्री. मनिष जयंतीलाल पटेल यांच्या कडून कायमच्या खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे दहिवली तर्फे नीड ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १३४ | २/२ | २.५६ .०० चौ.मी | २५-६० |

सबब वरील मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्ट पोटगी, वारस, भाडेपावती, वहीवाट वा तत्सम कोणतेही हक्क हितसंबंध असतील तर आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांच्याकडे स्वतः येवुन कळवाव्यात. वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजण्यात येवुन विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलांच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : २८ मे २०२४

**ॲड. शंकेश राजेश ठाकरे**
रा. गौरकामथ, ता. कर्जत,
जि. रायगड

## नोटीस

दिनांक २८/०५/२०२४

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १.श्री. सुरेश धाकुराम घरत, २. सौ. शुभांगी सुरेश घरत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार(रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | १३२७ | क्षेत्र ०-०३-५०<br>पो.ख.०-००-००<br>**एकूण क्षेत्र ०-०३-५०** | ०.८३ |

**वर नमुद शेत जमिन व ग्रामपंचायत नागाव हद्दीतील घर मालमत्ता क्र. २१३१, क्षेत्र २५२ चौ.फुट ही घर मिळकत.**

दिनांक :- २८/०५/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :-फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. दत्तात्रय लक्ष्मण मोहिते यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३४ | १ | ०-१६-९० | १=३१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०५/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मौजे-वहाळ, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक श्री. काना गंगाराम ठाकूर व इतर यांचेकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**संपादित जमिन व इरादित भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| गाव/ निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि. क्र. | क्षेत्र (हे. आर.) | मंजुर पात्रता (चौ.मी.) | निवाडाधारकाचे नाव | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| वहाळ १४४ | ३७५/०<br>३८०/३ | २-२७-०<br>०-५४-० | २४५० चौ.मी. पैकी उर्वरित ५५० चौ.मी. | काना गंगाराम ठाकूर<br>गोपाळ हासू ठाकूर | उलवे | १६ | B-१२/१ | ५५० |

शासन निर्णयानूसार साडेबारा टक्के योजनेअंतर्गत वरील तक्त्यात नमूद संपादित जमिनीपोटी २४५० चौ.मी. पात्रता मंजुर आहे. तद्नंतर मुळ भुधारक श्री. काना गंगाराम ठाकूर व मुळ भुधारक कै. गोपाळ हासू ठाकूर (मयत) यांचे वारस १) जयराम गोपाळ ठाकूर व २) जानकूबाई दत्तू म्हात्रे यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मौजे वहाळ निवाडा क्र. १४४, सर्व्हे क्र./हि.क्र. ३७५/०, ३८०/३, क्षेत्र २-८१-० हे.आर. या जमिनीपोटी मंजुर २४५० चौ.मी. पात्रतेचे श्री. काना गंगाराम ठाकूर यांच्या हिश्यास १२०० चौ.मी. व श्री. गोपाळ हासू ठाकूर यांच्या हिश्यास १२५० चौ.मी. असे विभाजन करण्यात आलेले आहे. मुळ भुधारक श्री. काना गंगाराम ठाकूर यांच्या हिश्यास आलेल्या १२०० चौ.मी. पात्रतेपैकी ६५० चौ.मी. पात्रतेकरिता उलवे नोड येथील भूखंड क्र. २२, सेक्टर-२१, क्षेत्र-६५० चौ.मी. या भुखंडाचे वाटप करण्यात आले असून उर्वरित ५५० चौ.मी. पात्रतेकरिता भुधारकांना दि. ११/०६/२०२२ रोजीच्या संगणकीय सोडतीव्दारे उलवे नोड येथील भूखंड क्र. B-१२/१, सेक्टर-१६, क्षेत्र-५५० चौ.मी. हा भूखंड इरादित करण्यात आला आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारक **कै. काना गंगाराम ठाकूर व कै. सावित्री काना ठाकूर (मयत) यांचे वारस** १. श्रीमती तुळसा ऊर्फ निर्मला बाळकृष्ण मुंबईकर, २. श्रीमती शालीनी अविनाश मुंबईकर, ३. श्रीमती बेबी भगवान पाटील, ४. श्रीमती सरीता गुरुनाथ घरत यांनी सह दुय्यम निबंधक-२, पनवेल यांच्याकडे दिनांक ११/०९/२०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल-२-१६०२२/२०२३ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून उलवे नोड येथील भूखंड क्र. B-१२/१, सेक्टर-१६, क्षेत्र-५५० चौ.मी. या भूखंडाचे लाभ १. श्री. मधूकर कान्हा ठाकूर, २. श्री. शंकर कान्हा ठाकूर यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.

हक्कसोड पत्रकांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या **'१०अ'** बाबत दिनांक २९.०५.२०१४ अन्वये कार्यपध्दती निश्चित केली आहे.

सदर महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट-१९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या **'१०अ'** च्या **मूद्दा क्र. ii** नुसार हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्यानुसार वर नमूद हक्कसोड पत्रामध्ये उलवे नोड येथील भूखंड क्र. B-१२/१, सेक्टर-१६, क्षेत्र-५५० चौ.मी. या भूखंडाचा तपशील नमूद केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| **कै. काना गंगाराम ठाकूर व**<br>**कै. सावित्री काना ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>१.श्रीमती तुळसा ऊर्फ निर्मला बाळकृष्ण मुंबईकर<br>२. श्रीमती शालीनी अविनाश मुंबईकर<br>३. श्रीमती बेबी भगवान पाटील,<br>४. श्रीमती सरीता गुरुनाथ घरत | १. श्री. मधूकर कान्हा ठाकूर<br>२. श्री. शंकर कान्हा ठाकूर |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून खालील व्यक्ती उपरोक्त भूखंडाचे वाटप स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

वरील इरादित केलेल्या भूखंडासंदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत /तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी- बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून (३०) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी तथा**
**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/०३२/२०२४-२५

# आयपीएलच्या ट्रॉफीवर केकेआरने कोरले नाव



**। चेन्नई । वृत्तसंस्था।**
**आयपीएलच्या १७ व्या हंगामाचे विजेतेपद कोलकाता नाईट रायडर्स संघाने जिंकले. कोलकाताने अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा ८ गडी राखून पराभव करत तिसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरले. आयपीएलमध्ये केकेआर संघाने १० वर्षांनंतर ट्रॉफी जिंकली आहे. यावेळी कोलकाताची कामगिरी उत्कृष्ट राहिली.**

यापूर्वी कोलकत्ताची अशी कामगिरी आयपीएलमध्ये एकदाच पाहायला मिळाली होती.

आयपीएल २०२४ मध्ये कोलकाता गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहिला. साखळी फेरीत केकेआरने १४ पैकी ९ सामने जिंकले होते आणि केवळ ३ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. त्याचवेळी पावसामुळे २ सामने रद्द झाले. त्यानंतर कोलकाताने क्वालिफायर-१ सामना जिंकून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. हैदराबादचा पराभव करून तिसऱ्यांदा चॅम्पियन ठरले. म्हणजेच कोलकाता नाईट रायडर्सला या मोसमात एकूण ३ पराभवांना सामोरे जावे लागले.

आयपीएलच्या एका हंगामात सर्वात कमी सामने गमावणारा कोलकाता नाइट रायडर्स संयुक्तपणे पहिला संघ ठरला आहे. याआधी, २००८ मध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या आयपीएल हंगामातही राजस्थान रॉयल्ससंघाला केवळ ३ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला होता. विशेष म्हणजे त्या मोसमात राजस्थान रॉयल्सनेही ट्रॉफीवर कब्जा केला होता. त्याच वेळी, या यादीत दुसऱ्या स्थानावर गुजरात टायटन्सचा संघ आहे, ज्याने २०२२ मध्ये खेळल्या गेलेल्या आयपीएल हंगामात केवळ ४ सामने गमावले आणि ते देखील चॅम्पियन बनले होते.

अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. जो केकेआरच्या गोलंदाजांनी चमकदार कागमगिरी करत चुकीचा सिद्ध करताना सनरायझर्स हैदराबादसंघाला १८.३ षटकात ११३ धावांवर रोखले. त्यानंतर अवघ्या १०.३ षटकांत त्याने हे लक्ष्य गाठले. केकेआरच्या लक्ष्याचा पाठलाग करताना व्यंकटेश अय्यरच्या बॅटमधून शानदार खेळी पाहायला मिळाली. त्याने नाबाद अर्धशतक झळकावत संघाला चांगला विजय मिळवून दिला.

## कोट्यवधी रकमेच्या बक्षिसांची लयलुट

### विजेता संघ
आयपीएल २०२४ च्या अंतिम सामन्यात कोलकाताने हैदराबादचा ८ गडी राखून पराभव करून ट्रॉफी जिंकली म्हणून कोलकत्ता संघाला २० कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले.

### पर्पल कॅप
या हंगामात पंजाब किंग्जकडून खेळताना हर्षलने १४ सामान्यत सर्वाधिक २४ विकेट्स घेतल्या. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याला पर्पल कॅप आणि बक्षीस म्हणून दहा लाख रुपये मिळाले.

### उपविजेता संघ
आयपीएल २०२४ चा उपविजेता संघ हा हैदराबाद ठरल्यामुळे त्यांना उपविजेतेपदासाठी १२. ५ कोटी रुपये बक्षीस म्हणून देण्यात आले.

### ऑरेंज कॅप
या हंगामात विराट कोहलीने १५ सामन्यांत ६१.७५ च्या सरासरीने ७४१ सर्वाधिक धावा केल्यामुळे तो ऑरेंज कॅपचा मानकरी ठरला. त्याला त्याच्या या दमदार कामगिरीमुळे दहा लाख रुपये बक्षीस म्हणून मिळाले.

### सुपर सिक्स ऑफ द सीझन
हैदराबादच्या सलामीवीर अभिषेक शर्माने आयपीएल २०२४ मध्ये सर्वाधिक षटकार ठोकले आणि त्यामुळे या पुरस्काराचा मानकरी तो ठरला. त्याने या हंगामात ४२ षटकार मारले आणि त्यासाठी त्याला बक्षीस म्हणून दहा लाख रुपये मिळाले.

### कॅच ऑफ द सीझन
कोलकत्ता विरुद्ध लखनौच्या सामन्यात कोलकात्ताच्या रमणदीपने अर्शिन कुलकर्णीचा झेल घेतला त्याला या हंगामाचा कॅच ऑफ द सीझनचा पुरस्कार आणि दहा लाख रुपये बक्षिस म्हणून मिळाले.

### स्ट्रायकर ऑफ द सीझन
स्ट्रायकर ऑफ द सीझन पुरस्कार २२ वर्षीय दिल्ली कॅपिटल्सचा दमदार फलंदाज जेक फ्रेझर मॅकगर्कला देण्यात आला. मॅकगर्कने या हंगामातमध्ये नऊ सामन्यांमध्ये २३४ स्ट्राईक रेटने ३३० धावा केल्या यासाठी त्याला बक्षिस म्हणून दहा लाख रुपये मिळाले.

### इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीजन
हैदराबादचा २१ वर्षीय अष्टपैलू नितीश रेड्डी याला आयपीएल २०२४ चा इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीझनचा पुरस्कार मिळाला. रेड्डीने या हंगामात १३ सामन्यात ३३.६७ च्या सरासरीने ३०३ धावा केल्या. तिन बळीही घेतले. पहिल्याच हंगामात दमदार कामगिरी केल्यामुळे त्याला त्यासाठी बक्षिस म्हणून दहा लाख रुपये मिळाले.

### फॅन्टसी प्लेयर ऑफ द सीझन
या हंगामात फॅन्टसी प्लेयर ऑफ द सीझन पुरस्काराचा मानकरी सुनील नरेन ठरला. त्यासाठी त्याला बक्षीस म्हणून दहा लाख रुपये मिळाले. गोलंदाजीसोबतच नरेनने या हंगामात फलंदाजीत सुद्धा दमदार कामगिरी केली.

### ऑन द गो फोर्स ऑफ द सीझन
हैदराबादच्या ट्रॅव्हिस हेडला या हंगामात सर्वाधिक चौकार मारल्याबद्दल ऑन द गो फोर्स ऑफ द सीझन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या हंगामात त्याने एकूण ६४ चौकार मारले आणि त्यासाठी त्याला बक्षीस म्हणून दहा लाख रुपये मिळाले.


### मोस्ट वैल्युएबल प्लेयर
आयपीएल २०२४ मधला मोस्ट वैल्युएबल प्लेयर हा सुनील नरेन ठरला. या हंगामात त्याने फलंदाजी करत ४८८ धावा केल्या, तर गोलंदाजीत १७ बळी घेतले. त्याच्या या कामगिरीमुळे त्याला या पुरस्काराचा मानकरी ठरला आणि दहा लाख रुपये बक्षिस म्हणून मिळाले.

# चिरनेर येथे राज्यस्तरीय एकेरी नृत्य स्पर्धेचे आयोजन

**। चिरनेर । वार्ताहर ।**
उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्रख्यात नृत्यांगणा आर्या मंगेश नारंगीकर हिच्या जन्म दिनानिमित्ताने श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ आणि महागणपती ४० प्लस मास्टर चिरनेर यांच्यावतीने २ जून रोजी चिरनेर येथील श्रीराम मंदिराच्या प्रांगणात रात्री आठ वाजता, राज्यस्तरीय एकेरी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यात १३ वर्षाखालील लहान गटातील नृत्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १५० रुपये प्रवेश फी आकारण्यात आली आहे. तर १४ वर्षावरील मोठ्या गटातील नृत्य स्पर्धेची फी ४०० रुपये ठेवण्यात आली आहे. लहान गटात नृत्य स्पर्धेत प्रथम येणाऱ्या विजेत्या स्पर्धकाला तीन हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी देण्यात येईल. द्वितीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी, तृतीय क्रमांकासाठी एक हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. १४ वर्षावरील नृत्य स्पर्धेच्या मोठ्या गटात प्रथम क्रमांक सात हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी, द्वितीय क्रमांक पाच हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी, तृतीय क्रमांक तीन हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी अशी पारितोषिके विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. सदर स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी प्रणय तांबे (७६ ६६ ७५ २२ ७५) संकेत जयस्वाल (७० २१ ७२ ४५ ६०) पप्पू सूर्यराव (९८ २१ ६२ ५३६२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेच्या पूर्वतयारीची लगबग जोरदारपणे सुरू असून, श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ आणि महागणपती ४० प्लसमास्टर चिरनेरचे कार्यकर्ते तयारीच्या दृष्टीने विशेष परिश्रम घेत आहेत.

# दीपा कर्माकरने इतिहास रचला



**नवी दिल्ली :** ऑलिम्पियन भारतीय जिम्नॅस्ट दीपा कर्माकरने रविवारी आपल्या शानदार कामगिरीने इतिहास रचला. या चॅम्पियनशिपमध्ये भारतीय जिम्नॅस्टने सुवर्ण पदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. ३० वर्षीय दीपाने स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी व्हॉल्ट फायनलमध्ये सरासरी १३.५६६ स्कोअर केला. उत्तर कोरियाच्या किम सोन हयांग (१३.४६६) आणि जो क्योंग बायोल (१२.९६६) यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक जिंकले. डोपिंग उल्लंघनामुळे २१ महिन्यांनंतर गतवर्षी पुनरागमन करणारी दीपा आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी स्पर्धेबाहेर आहे.

# काव्या मारनला अश्रू अनावर

**। चेन्नई । वृत्तसंस्था।**
कोलकाता नाईट रायडर्सने १० वर्षानंतर इंडियन प्रीमिअर लीगचे जेतेपद पटकावले. इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये प्रतिस्पर्धी संघाच्या मनात धडकी भरवणारे सनरायझर्स हैदराबादचे फलंदाज आज अपयशी ठरले. आतापर्यंत ही स्पर्धा फलंदाजांची वाटत होती, परंतु फायनलमध्ये चित्र परस्पर विरोधी दिसले. हैदराबादला ११३ धावांवर ऑल आऊट करून कोलकाताने १०.३ षटकांत २ बाद ११४ धावा करून ८ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. या पराभवानंतर हैद्राबाद संघाची मालकिण काव्या मारन पुन्हा चर्चेत आली. २०१६ नंतर यंदाचे जेतेपद आपलेच असे तिला वाटले होते, परंतु फायनलमध्ये चित्र बदलले. तिला अश्रू अनावर झाले. थोडसं रडून तिने स्वतःला सावरले आणि आपल्या खेळाडूंना चिअर करण्यासाठी उभी राहिली. २०१२ व २०१४ मध्ये त्यांनी गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली आयपीएल चषक उंचावला होता. गौतम गंभीर हा विरोधी संघाचा मेंटॉर आहे. गोलंदाजांच्या उल्लेखनीय कामगिरीनंतर वेंकटेश अय्यरने एकहाती सामना जिंकून दिला. फायनलमध्ये पूर्णपणे लोटांगण घातले. कर्णधार पॅट कमिन्स ( २४) हा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. मिचेल स्टार्क ( २-१४), हर्षित राणा ( २-२४) व आंद्रे रसेल (३-१९) यांच्या माऱ्यासमोरचा पूर्ण संघ १८.३ षटकांत ११३ धावांत तंबूत परतला. प्रत्युत्तरात पॅट कमिन्सने दुसऱ्याच षटकात सुनील नरीनला (६) झेलबाद करून माघारी पाठवले. मात्र, वेंकटेश अय्यर आणि रहमनुल्लाह गुरबाज यांनी ४५ चेंडूंत ९१ धावा जोडून विजय निश्चित केला. शाहबाज अहमदच्या गोलंदाजीवर गुरबाज (३९) बाद झाला. वेंकटेश २६ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांसह ५२ धावांवर नाबाद राहिला आणि कोलकातान १०.३ षटकांत २ बाद ११४ धावा करून सामना जिंकला.

# दीपिका कुमारीचे अपयश कायम

## रिकर्व्हमध्ये भारतीय पदकविना



**। येचॉन । वृत्तसंस्था।**
भारताची अनुभवी तिरंदाज दीपिका कुमारी मातृत्वानंतर पुन्हा तिरंदाजीतील आपला दबदबा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, येथील विश्वकरंडक तिरंदाजी स्पर्धेत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावरील अनुक्रमे लीन सिह्यॉन आणि अलजेंद्रा वॅलेंन्सिया यांच्या वर्चस्वाला शह देऊ शकली नाही.

दीपिकाच्या या अपयशामळे रिकर्व्ह प्रकारातून भारतीय तिरंदाज रिकाम्या हाती परतणार आहेत. हा रिकर्व्ह प्रकार ऑलिंपिकमधील महत्त्वाचा प्रकार आहे. रिकर्व्हमध्ये अपयश आलेले असले, तरी भारतीयांनी कंपाऊंड प्रकारात एक सुवर्ण आणि एक रौप्य अशी कामगिरी केली आहे. शनिवारी झालेल्या कंपाऊंड प्रकाराच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने (ज्योती-परनीत-आदिती) सुवर्णपदक जिंकले होते, तर मिश्र दुहेरीत रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. पण या पदकांमध्ये दीपिकाचा समावेश नव्हता. दक्षिण कोरियाच्या २० वर्षीय लीन हिने या विश्वकरंडक स्पर्धेत दीपिकावर ६-२ (२८-२६, २८-२८, २८-२७, २७-२७) अशी मात केली. गेल्या महिन्यात झालेल्या पहिल्या विश्वकरंडक तिरंदाजीतही लीनने दीपिकाचा पराभव केला होता. गेल्या महिन्यातील या विश्वकरंडक स्पर्धेत दीपिकाचा सरळ सेटमध्ये पराभव झाल्यामळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. मात्र तिने दुसऱ्या आणि चौथ्या सेटमध्ये लीन हिला कडवी लढत दिली होती. ब्राँझपदकाच्या लढतीतही दीपिकाची हार झाली. वॅलेंन्सियाकडून ती ४-६ (२६-२९, २६-२८, २८-२५, २७-२५, २६-२९) अशी पराभूत झाली. या सामन्यात तीन-चार सेट जिंकण्याचे धैर्य दाखवले होते. परंतु, वॅलेंन्सियाला ती हरवू शकली नाही. दीपिकाविरुद्धच्या चार सामन्यात वॅलेंन्सिया हिचा हा दुसरा विजय आहे. मातब्बर खेळाडूंकडून झालेल्या पराभवामुळे दीपिकासाठी ऑलिंपिकपूर्वी धोक्याची घंटा वाजली आहे. चौथ्यांदा ती ऑलिंपिकसाठी पात्र ठरण्याचा प्रयत्न करणार आहे. आता ती दक्षिण कोरियाचे माजी दिग्गज तिरंदाज किम ह्युन ताक यांच्याकडून प्रशिक्षण घेत आहे. विश्वकरंडक स्टेज-३ ही स्पर्धा जूनमध्ये होत असून ती ऑलिंपिक पात्रतेसाठी अखेरची स्पर्धा असणार आहे.

# टी-२० विश्वचषकासाठी टिम इंडिया रवाना

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
पुढील महिन्यात अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाची पहिली तुकडी शनिवारी रात्री न्यूयॉर्कला रवाना झाली. रोहितसोबत मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडही मुंबई विमानतळावर दिसले. याशिवाय अष्टपैलू रवींद्र जडेजा, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव यांच्यासह सपोर्ट स्टाफचे सदस्यही पहिल्या तुकडीसह रवाना झाले.

सोशलमीडियावरएकव्हिडिओ व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये टीमचे सदस्य मुंबई विमानतळावर दिसत आहेत. भारतीय संघ ५ जून रोजी आयर्लंडविरुद्धच्या टी-२० विश्वचषकात आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. भारतीय संघाचा समावेश गट-अ मध्ये आहे. त्यामध्ये यजमान अमेरिका, कॅनडा आणि पाकिस्तानचे संघही आहेत. न्यू यॉर्कमध्ये ९ जून रोजी ग्रुप स्टेजमध्ये भारत आणि पाकिस्तान आमनेसामने असतील. भारतीय संघाने या जागतिक स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली होती, तर शुभमन गिल, रिकुन सिंग, खलील अहमद आणि आवेश खान राखीव खेळाडू म्हणून संघात सामील होतील. संजू सॅमसन, युजवेंद्र चहल, आवेश खान आणि यशस्वी जैस्वाल या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रवाना होतील. हे चार खेळाडू आयपीएल २०२४ मध्ये सहभागी झाले होते. हार्दिक काही दिवस लंडनमध्ये प्रशिक्षण घेणार असून तेथून तो थेट संघात सामील होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र हार्दिक संघात कधी सामील होणार हे अद्याप निश्चित झालेले नाही.२० विश्वचषक स्पर्धेतील गट टप्प्यातील सामने सुरू होण्यापूर्वी भारत एकमेव सराव सामना खेळणार आहे. भारतीय संघ १ जून रोजी न्यूयॉर्कमध्ये बांगलादेशविरुद्ध सराव सामना खेळणार आहे. त्याच दिवशी डॅलस येथे होणाऱ्या स्पर्धेच्या उद्घाटन साम न्यात कॅनडाचा सामना सह-यजमान अमेरिकेशी होणार आहे.

# एफआईएच प्रो लीग
## भारतीय पुरुष हॉकी संघ पराभूत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारतीय पुरुष हॉकी संघाला प्रो लीगमध्ये २-२ अशा बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये बेल्जियमकडून १-३ ने पराभव पत्करावा लागला. अराजित सिंगने ११ व्या मिनिटाला आघाडी मिळवून दिली. मात्र ३० व्या मिनिटाला फेलिक्सने स्कोअर १-१ असा केला. फ्लोरेंटने (५० व्या मिनिटाला) बेल्जियमला आघाडी मिळवून दिली. मात्र, सुखजीतने (५७ व्या मिनिटाला) स्कोअर २-२ असा केला.

बेल्जियममधील अँटवर्प येथे खेळल्या जात असलेल्या प्रो लीगमध्ये भारतीय पुरुष संघाला निराशेचा सामना करावा लागला आहे. बेल्जियम सोबत खेळल्या जात असलेल्या सामन्यात संघाला पेनल्टी शूटआऊटमध्ये १-३ ने पराभवाची चव चाखावी लागली. शूटआऊटमध्ये भारतासाठी केवळ सुखजीतला गोल करता आला.

# पर्यटकांनी अनुभवला अश्वशर्यतीचा थरार

***। माथेरान । वार्ताहर ।***
***गेली पन्नास वर्षे माथेरान युथ सोशल क्लब आणि माथेरान नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरानमध्ये अश्वशर्यतींचे आयोजन केले जाते. या वर्षी देखील स्थानिकांसह पर्यटकांना डोंगरमाथ्यावर अश्वशर्यतीचा थरार अनुभवता आला. यामध्ये सर्वोत्तम घोडा, सर्वोत्कृष्ट जॉकीसह अन्य पारितोषिके देण्यात आली.***



*ऑलिम्पिया रेसकोर्स म्हणजे वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल येथे २५ आणि २६ मे २०२४ रोजी अश्वशर्यती पार पडल्या. माथेरान हे फक्त पर्यटनस्थळ नसून हॉर्स रायडिंगचे प्रमुख ठिकाण आहे. येथील ऑलिम्पिया रेसकोर्स येथे माथेरानमधील प्रमुख अश्वपालकांकडून रायडिंगचे धडे दिले जातात.अनेक अश्व प्रेमी येथे हॉर्स रायडिंग शिकतात.अशा नवोदित घोडा चालकांची या*

*मुंबई, पुणे, हैद्राबाद येथून आलेल्या घोडेस्वारांनी उपस्थित राहून येथील अश्व शर्यतीमध्ये सहभाग नोंदवला. अश्वशर्यतींमध्ये सर्वोत्कृष्ट घोडा म्हणून अँमेझॉन या घोड्याची निवड करण्यात आली.अँमेझॉन हा घोडा म ागील सलग चार वर्षांपासून सर्वोत्कृष्ट घोडा होण्याचा खिताब त्याच्या नावावर आहे. यंदाचा सर्वोत्कृष्ट जॉकी हैद्राबादचा अयान मूर्ती, १४ वर्षे वयोगटाखालील चॅम्पियन जॉकी म्हणून देखील अयान मूर्तीचीच निवड झाली. स्मार्ट हॉर्स ऑफ द माथेरानचा मानाचा खिताब निधी जाधव यांच्या डोरो या घोड्याने पटकावला. लाईफ टाइम आचिवमेंट अवॉर्डने जुने जाणते जॉकी राजेंद्र उर्फ लक्ष्मण कदम यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.अतिशय रंगतदार शर्यती पाहून आलेले पर्यटक मंत्रमुग्ध झाले.रायगड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे,माथेरानचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने,जेष्ठ घोडेस्वार राजेंद्र कदम,माजी नगरसेवक संजय शिंदे,किरण जाधव, नितीन शेळके,अकबर मुजावर,खास करून एम.वाय.एस.सी चे संस्थापक प्रदीप दिवाडकर,पत्नी शर्मिला दिवाडकर आणि त्यांच्या मुलांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.*

> **अश्वशर्यती माथेरानचे पर्यटनाचे केंद्रबिंदू बनत आहे. खेळ आम्ही अपग्रेड करून राष्ट्रीय पातळीवर कसे जातील याकडे लक्ष देणार आहोत.**
> **-प्रशाम दिवाडकर,**
> **अध्यक्ष एम.वाय.एस.सी**




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)